दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१५४ | सोमवार दि.२४ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## मराठवाड्यात १.३२ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत मराठवाड्यातील १ लाख ३२ हजार ३३३ शेतकऱ्यांना आतापर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळाला आहे. या शेतकऱ्यांची तब्बल ८९९ कोटी रुपयांची कर्जरक्कम माफ करण्यात आली आहे. योजनेच्या प्रगतीचा नुकताच शासनस्तरावर ऑनलाइन आढावा घेण्यात आला. त्यातून मराठवाड्यातील कर्जमाफीची सद्यस्थिती समोर आली आहे.**

योजनेअंतर्गत मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमधून १२ लाख ८० हजार ७८४ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर दाखल करण्यात आली आहे. त्यापैकी ६ लाख २६ हजार ३५१ शेतकरी ग्रीन लिस्टनुसार कर्जमुक्तीसाठी पात्र ठरले आहेत. मात्र, पात्र ठरलेल्या सर्व शेतकऱ्यांना अद्याप कर्जमाफीचा लाभ मिळालेला नाही. पात्र शेतकऱ्यांपैकी ४ लाख ६९ हजार ७२७ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. तर १ लाख ५६ हजार ६२४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप बाकी आहे. त्यामुळे आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली या चार जिल्ह्यांतील ७१ हजार ११७ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाला आहे. या शेतकऱ्यांची सुमारे ४३६ कोटी रुपयांची कर्जरक्कम माफ करण्यात आली आहे. तर लातूर विभागातील लातूर, नांदेड, बीड आणि



धाराशिव या चार जिल्ह्यांतील ६१ हजार २१६ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाला असून, या विभागातील कर्जमाफीची रक्कम सुमारे ४६२ कोटी रुपये आहे. जिल्हानिहाय आकडेवारीनुसार छत्रपती संभाजीनगर जिल्हा कर्जमाफीच्या लाभात आघाडीवर आहे. या जिल्ह्यात ३५ हजार ५४० शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाला आहे. जिल्ह्यातील १ लाख ९० हजार ७०१ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून, त्यापैकी १ लाख ३ हजार ८८७ शेतकरी ग्रीन लिस्टनुसार पात्र ठरले आहेत. यानंतर जालना जिल्ह्यात १८ हजार ७९२, लातूरमध्ये २२ हजार ९६३, बीडमध्ये १३ हजार ११०, नांदेडमध्ये १२ हजार ९२९, धाराशिवमध्ये १२ हजार २१४, हिंगोलीमध्ये ८ हजार ९१५, तर परभणी जिल्ह्यात ७ हजार ८७० शेतकऱ्यांना

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### मैदान वाचवण्यासाठी एकत्र या–ठाकरे

मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मुंबईतील मोकळी मैदाने वाचवूया हे आंदोलन सुरु करण्यात आलं आहे. वांद्रे येथील नेव्हिल डिसूझा फुटबॉल मैदानाचं आरक्षण बदलू नये यासाठी आज आमदार आदित्य ठाकरेयांच्या उपस्थितीत तिरंगा आंदोलन करण्यात आलं.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जेनझीनं स्क्रीन पेक्षा मैदानावर असावं, असं म्हटलं पण तुम्ही मैदानं ठेवताय कुठे असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला. मुंबईची मैदानं आणि मुंबई वाचवण्यासाठी सर्वांनी मतभेद विसरत तिरंगा हाती घेत एकत्र यावं, असं आदित्य ठाकरे म्हणाले. आज आपण इथे जमलेलो आहोत ते मुंबईची मोकळी मैदान, मुंबईची रिक्रीएशन ग्राऊंड, प्ले ग्राऊंड ही मैदानंच राहिली पाहिजेत, त्यावर काँक्रिट टाकलं नाही पाहिजे, हे ठरवण्यासाठी आपण जमलो आहोत. असं आदित्य ठाकरेंनी सांगितलं.

### यशस्वी जैस्वालवर ५ सामन्यांची बंदी?

कोलंबो; भारत आणि श्रीलंका यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी मैदानावर वातावरण चांगलंच तापलं. भारताचा स्टार सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज असिथा फर्नांडो यांच्यात जोरदार वाद झाला. जैस्वाल ४५ धावांवर बाद झाल्यानंतर दोन्ही खेळाडू आमनेसामने आले. इतकंच नाही, तर दोघे एकमेकांशी डोकं भिडवतानाही दिसले. अखेर इतर खेळाडूंनी मध्यस्थी करत हा वाद शांत केला. मात्र, या घटनेनंतर आता यशस्वीवर आयसीसीच्या कारवाईची टांगती तलवार आहे.भारताच्या डावातील १७व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर असिथा फर्नांडोने यशस्वी जैस्वालला क्लीन बोल्ड केलं. यशस्वी ४५ धावांवर बाद झाला. विकेट गमावल्यानंतर तो पॅव्हेलियनच्या दिशेने जात असताना फर्नांडोने त्याच्याकडे काहीतरी टिप्पणी केली. त्यानंतर यशस्वी संतापला आणि तो पुन्हा फर्नांडोकडे वळला. पाहता पाहता दोघांमध्ये जोरदार शाब्दिक वाद सुरू झाला.

### रोहित पवारांच्या पिएच्या मुलीचा संशयास्पद मृत्यू

बारामती: बारामतीमधील रुई येथील साई गणेश नगर परिसरात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांचे पीए अजित दशावतारे यांच्या मुलीचा संशयास्पद स्थितीत मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. या घटनेने संपूर्ण बारामती शहरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांच्या फॉरेन्सिक टीमसह पोलीस दल घटनास्थळी दाखल झाले होते या घटनेचा तपास वेगाने सुरू आहे. तर आमदार रोहित पवारांनी पोलिसांची आणि डॉक्टरांची देखील यासंबंधी भेट घेतली होती, त्यानंतर आता प्राथमिक पुराव्यानुसार मुलीने आत्महत्या केली असल्याचं प्रथमदर्शनी दिसत आहे असं पोलिसांचं म्हणणं आहे. पोस्टमार्टम अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल असे देखील पोलिसांचे म्हणणं आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ ऑगस्ट २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०२.०० क्विंटल | २,४३४ | २,८३० | २,६१४ |
| ज्वारी/हायब्रिड: ११०.५० क्विंटल | २,१०० | ४,००० | २,९०९३ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,४०१ | ७,३९९ | ६,९०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ४०.०० क्विंटल | २,२९२ | ३,८०० | २,७३१ |
| मुग: ८.५० क्विंटल | ८,७०० | ८,८०० | ८,७५० |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ५,८३० | ५,८३० | ५,८३० |

## मराठ्यांच्या विरोधात जाणं हे सामान्य ओबीसींनाही मान्य नाही–मनोज जरांगे

**जालना । प्रतिनिधी**



**आमचे सगळे बांधव आता ताकतीने कामाला लागले आहेत. १२३ गावातील सर्व प्रमुख मराठा बांधव आज आले होते. मराठ्यांनी आता आपल्या गावातील गाड्या बाहेर काढून आंतरवाली सराटीला यावं असे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. जातीच्या भिंतीचा यामध्ये काही संबंध नाही. मराठ्यांच्या विरोधात जाणं, मराठ्यांच्या आरक्षणाला विरोध करणं हे सामान्य ओबीसींना देखील मान्य नसल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले.**

कोणत्या मायक्रो ओबीसींना शिक्षण नीट आहे, कोणत्या मायक्रो ओबीसिंना जागा नीट खाऊ दिल्या, नोकरीतल्या? ५० वेळा ▶▶ पान २ वर

### मराठे देखील डाव टाकणार

सरकारनं डाव टाकला तर मराठे देखील सरकारवर डाव टाकणार असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. मुंबईतील आख्खे मराठा एक झालेत. ते कधीही मुंबईला या असे म्हणतात, त्यांचा आम्हाला गर्व असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. ते सज्ज झाले आहेत. सरकानं डाव टाकूद्या पुढची रणणिती काय ते समजेल असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

## पार्थ पवारांच्या घरी हाय व्होल्टेज बैठक

### प्रशांत किशोर यांचे राष्ट्रवादीच्या नेत्यांना खडे बोल



**मुंबई । प्रतिनिधी**

**'राष्ट्रवादी काँग्रेस पूर्णपणे थंड पडली आहे. राज्यात पक्षाचे अस्तित्व ठळकपणे दिसत नाही. पक्षाचे विभागही फारसे कार्यरत नाहीत. समन्वयाचा अभाव असून तो वाढविण्याची गरज आहे', अशा शब्दांत राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांना शनिवारी** ▶▶ पान २ वर

### कोण कोण होते उपस्थित?

या बैठकीला पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, मंत्री छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, नरहरी झिरवाळ, बाबासाहेब पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, नवाब मलिक, धनंजय मुंडे आणि राज्यमंत्री इंद्रनील नाईक उपस्थित होते.

### 'त्यांचा सल्ला कशासाठी?'

राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून पक्षासोबत राहिलेल्या आणि प्रतिकूल परिस्थितीत अनेक निवडणुका लढवून जिंकलेल्या नेत्यांना राजकीय रणनीतीकाराने धडे द्यावेत, याबद्दल काहींनी खासगीत नाराजी व्यक्त केल्याचे समजते. 'पक्षातील निर्णयप्रक्रिया आणि संघटनात्मक दिशा योग्य असती, तर बाहेरून असा सल्ला घेण्याची वेळ आली नसती', असा सूरही काही नेत्यांनी खासगीत व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## तुकाराम मुंढेंच्या विरोधात व्यापारी न्यायालयात जाणार

**नाशिक । प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढें यांनी आपला मोर्चा आता खाद्य तेलाकडे वळवला आहे. सुट्टे तेल विकू नका, घेऊ नका असे आदेश मुंडे यांनी दिले आहेत. दरम्यान, मुंडेंच्या या निर्णयाला काही व्यापाऱ्यांचा विरोध असल्याचं पाहायला मिळत आहे. नाशिकमध्ये तुकाराम मुंडेंच्या सुट्टे खाद्यतेल विक्री बंदी निर्णयाच्या विरोधात राज्यातील व्यापाऱ्यांची बैठक पार पडली. तुकाराम मुंढे यांच्या निर्णयाला व्यापारी




न्यायालयात आव्हान देणार आहेत. याबाबत व्यापाऱ्यांनी राज्य सरकारला पंधरा दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.

राज्यभरातील व्यापारी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचा इशारा आज नाशिकमध्ये व्यापाऱ्यांची बैठक पार पडली. तुकाराम मुंडे यांनी सुट्टे खाद्यतेल विक्री बंदी निर्णयाला व्यापाऱ्यांनी विरोध केला आहे. हा निर्णय मागे न घेतल्यास राज्यभरातील व्यापारी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. वेळ पडल्यास न्यायालयात धाव घेत केंद्र सरकारकडेही पाठपुरावा करणार असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे. दहा लाख रुपये दंड आणि कारावास अन्यायकारक असून आम्ही अतिरेकी आहोत का? असा संतप्त सवाल खाद्यतेल व्यापाऱ्यांनी केला आहे. ▶▶ पान २ वर

## मनोज जरांगेंची लढाई आमच्याविरुद्ध नाही–छगन भुजबळ

**नाशिक । प्रतिनिधी**

**एकीकडे मनोज जरांगे पाटील यांच्याकडून २९ ऑगस्टच्या आंदोलनाची तयारी सुरू आहे. दुसरीकडे ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी आज समता परिषदेची बैठक घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. गेल्या अनेक दिवसांपासून समता परिषदेची बैठक झाली नव्हती, आज राज्यातील वरिष्ठ पदाधिकारी यांच्यासोबत संवाद केला. समता परिषदेच्या सर्व**



**कार्यक्रमांची उजळणी केल्याचे सांगत छगन भुजबळ यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. यावेळी, मनोज जरांगे पाटील यांच्या २९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आंदोलनावरही त्यांनी भूमिका मांडली, तर लक्ष्मण हाकेंकडून ओबीसींचेआरक्षण संपल्याबाबत सातत्याने होत असलेलं वक्तव्य अमान्य असल्याचे बोलून दाखवले.**

कोण म्हणते ओबीसीचे आरक्षण संपले? जात पडताळणीमध्ये चुका असेल तर त्यावर आम्ही लढतोय. २०११ पासून जात जनगणना करावी ही आमची मागणी होती, त्यावर सरकारने निर्णय घेतला आहे. सरकार आमच्यासोबत आहे, त्यावर आम्ही आता काय बोलणार, ▶▶ पान २ वर

## वाचाळवीर आमदारांना वेळीच आवरा–सुप्रिया सुळे

**सांगली । प्रतिनिधी**



सांगलीत एका मोर्चादरम्यान भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या एका वक्तव्यावरून आता राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. लांडगे यांच्या या विधानाचे राजकीय पडसाद उमटत असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार पक्ष) खा. सुप्रिया सुळे यांनी प्रक्षोभक वक्तृत्व करणाऱ्या वाचाळवीर आमदारांना वेळीच आवरा नाही तर गुन्हे दाखल करत अटक करावे अशी मागणी केली आहे.

सुप्रिया सुळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. माझी राज्याच्या गृहमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी अशा वाचाळवीर आमदारांना ▶▶ पान २ वर

## शाळा दत्तक घ्या एकनाथ शिंदेंचे आमदार–खासदारांना आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी मुंबईतील 'नंदनवन' बंगल्यावर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिका–यांसोबत तब्बल चार तास बैठक घेऊन राज्यातील शिक्षण क्षेत्राचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी विभागाच्या विविध उपक्रमांची, योजनांची



आणि आतापर्यंत झालेल्या प्रगतीची माहिती वरिष्ठ अधिका–यांनी एकनाथ शिंदे यांना दिली. शिक्षण मंत्रालयाकडून सुरू असलेल्या चांगल्या कामाचे कौतुक करताना एकनाथ शिंदे यांनी शिक्षण विभागाने आता मिशन मोडवर काम करून हे चांगले काम राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे, असे निर्देश दिले.

राज्यातील शाळांचे आधुनिकीकरण आणि शिक्षण व्यवस्थेत प्रत्यक्ष, दृश्यमान आणि गुणवत्तापूर्ण बदल घडवून आणण्यासाठी स्पष्ट, सर्वसमावेशक आणि कालबद्ध कृति आराखडा तयार करण्याचे निर्देश एकनाथ शिंदेंनी दिले. आपल्या मुलांच्या आकांक्षा बदलत ▶▶ पान २ वर

## साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी सरकारचं मोठं पाऊल

**मुंबई । प्रतिनिधी**

**सध्या सणासुदीचा काळ सुरु झाला आहे. या काळात साखरेच्या दरात मोठी वाढ झाली आहे. यामुळं ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. अशातच सरकारनं १० लाख टन साखर आयात करण्याचा देखील निर्णय घेतला आहे. साखरेच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहे. सणासुदीच्या काळात साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकारने मोठ्या घाऊक ग्राहकांसाठी साठा मर्यादा कमी केली आहे. १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत व्यापाऱ्यांना केवळ १५ दिवसांचा साठा ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे.**



साखरेची साठेबाजी आणि वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी सरकारचा मोठा निर्णय जर तुम्ही मिठाई, बेकरी, बिस्किट, कन्फेक्शनरी किंवा शीतपेयांच्या व्यवसायात असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सणासुदीच्या दिवसांपूर्वी साखरेची साठेबाजी आणि वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. मोठ्या प्रमाणात साखरेचा वापर करणाऱ्या मोठ्या व्यवसायांना आता निर्धारित मर्यादेपलीकडे साखरेचा साठा करणे कठीण जाऊ शकते. नवीन नियमांनुसार, निर्धारित मर्यादेपलीकडे साखरेचा साठा केल्यास कारवाई होऊ शकते.दरम्यान, सध्या सणासुदीचा काळ आहे. गणेश चतुर्थी, दसरा आणि दिवाळी यांसारख्या सणांमुळे ऑगस्ट ते नोव्हेंबर दरम्यान साखरेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. या काळात, अनेक व्यवसाय अनेकदा आगाऊ मोठ्या प्रमाणात साखर खरेदी करून तिचा साठा करतात. हे लक्षात घेऊन, सरकारने मोठ्या खरेदीदारांसाठी साठा करण्याचा कालावधी १५ दिवसांपर्यंत कमी केला आहे. त्यामुळं १५ दिवस पुरेल एवढाच साठा करता येणार आहे. नवीन आदेशानुसार, हा नियम १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत लागू राहील. हा नियम अशा व्यवसायांना किंवा संस्थांना लागू होईल ज्यांचा मासिक साखरेचा वापर १० मेट्रिक टन (१०० क्विंटल) पेक्षा जास्त आहे. असे खरेदीदार त्यांच्या ▶▶ पान २ वर

**कोणत्या व्यवसायांवर परिणाम ?**

- मोठे मिठाई विक्रेते
- बेकरी आणि कन्फेक्शनरी युनिट्स
- शीतपेय उत्पादक
- अन्न प्रक्रिया कंपन्या
- इतर मोठे घाऊक ग्राहक



## राज्यात साथीच्या आजाराचे थैमान

**मुंबई । प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यात कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव कायम असून, यंदा डेंग्यूच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आरोग्य विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. २१ ऑगस्टअखेर राज्यात मलेरियाचे १२ हजार २१९, डेंग्यूचे ६ हजार ३७९ आणि चिकुनगुनियाचे १ हजार ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# पितृसत्ताकतेचा पाश आणि आधुनिक भारताचे आव्हान

पुण्यात आयोजित 'छात्रों की गूंज' या विद्यार्थी संवाद कार्यक्रमातून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी 'पितृसत्ताकता ठेचा!' अशी थेट घोषणा देत महिलांच्या स्वातंत्र्याचा आणि तरुणांच्या प्रश्नांचा मुद्दा ऐरणीवर आणला. राजकीय भूमिका कोणाचीही असो; मात्र त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आजच्या भारताच्या सामाजिक आणि आर्थिक वास्तवाशी संबंधित आहेत. म्हणूनच सत्ताधाऱ्यांना काही थेट प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

भारत स्वातंत्र्याचा अमृतकाळ साजरा करून आधुनिकतेकडे वाटचाल करीत असल्याचा दावा करतो. मग आजही महिलांच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवण्याची मानसिकता का कायम आहे? महिलांच्या सुरक्षिततेच्या नावाखाली त्यांच्या हालचालींवर बंधने घालण्याऐवजी पुरुषांच्या मानसिकतेत बदल घडवण्यासाठी सरकार किती ठोस पावले उचलणार? अत्याचाराची घटना घडल्यानंतर पीडितेच्या कपड्यांवर, तिच्या वागण्यावर किंवा रात्री बाहेर पडण्यावर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना सरकार कधी जाब विचारणार? स्त्री ही कोणाची मालमत्ता नाही, कोणाच्या संरक्षणाची कायमची गरज असलेली व्यक्ती नाही; ती स्वतंत्र नागरिक आहे. संविधानाने तिला समान अधिकार दिले आहेत. मग प्रत्यक्ष जीवनात हा समानतेचा अधिकार अद्याप पूर्णपणे का उतरलेला नाही? मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव संपविण्यासाठी शिक्षणापासून प्रशासनापर्यंत सरकारची ठोस कृती कुठे आहे? हा प्रश्न केवळ महिलांपुरता मर्यादित नाही. देशातील तरुणाईसमोरही अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत. शिक्षण महाग होत आहे, स्पर्धा परीक्षांमध्ये पेपरफुटी आणि गैरप्रकाराच्या घटना वारंवार समोर येत आहेत आणि पदवी हातात असूनही रोजगाराची खात्री तरुणांना मिळत नाही. मग सरकारला सवाल असा पदवी घेऊन बाहेर पडलेल्या प्रत्येक तरुणाच्या हाताला काम देण्याची जबाबदारी कोणाची? रोजगारनिर्मितीची आकडेवारी दाखवण्यापेक्षा प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी किती निर्माण झाल्या, याचा हिशेब सरकार देशासमोर कधी ठेवणार? पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाते, त्यांचे मानसिक आणि आर्थिक नुकसान होते. मग दोषींवर कठोर कारवाई करण्याबरोबरच परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी कायमच्या दूर करण्यासाठी सरकारची दीर्घकालीन योजना काय आहे? गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण परवडावे यासाठी काय केले जात आहे? शिक्षण हा अधिकार आहे की बाजारातील महागडा व्यवहार, हा प्रश्नही सरकारने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. पितृसत्ताकता केवळ घरातील पुरुषसत्तेत नाही; ती राजकारणात, प्रशासनात, शिक्षणात, रोजगाराच्या संधींमध्ये आणि सामाजिक विचारांमध्येही दिसते. संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व वाढले पाहिजे, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे निर्णयप्रक्रियेत महिलांचा आवाज प्रभावीपणे ऐकला गेला पाहिजे. महिलांना केवळ योजनांच्या लाभार्थी म्हणून पाहण्याऐवजी धोरणनिर्मितीतील समान भागीदार म्हणून स्थान देण्याची तयारी सरकार दाखवणार आहे का? राहुल गांधींच्या वक्तव्याशी राजकीय मतभेद असू शकतात. त्यांच्यावर टीका करण्याचा अधिकारही सरकार आणि विरोधकांना आहे. पण प्रश्न विचारणाऱ्याला विरोधक म्हणून नाकारून प्रश्नच संपत नाहीत. महिलांची सुरक्षितता, तरुणांचा रोजगार, शिक्षणाचे बाजारीकरण आणि समानतेचा घटनात्मक अधिकार हे कोणत्याही एका पक्षाचे प्रश्न नाहीत; ते देशाचे प्रश्न आहेत. म्हणूनच केंद्र आणि राज्य सरकारला आज एकच सवाल 'नवा भारत' घडविण्याच्या घोषणा भरपूर झाल्या; पण त्या नव्या भारतात महिलांना निर्भय स्वातंत्र्य, तरुणांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि प्रत्येक पात्र तरुणाला सन्मानाचा रोजगार कधी मिळणार? घोषणांनी पितृसत्ताकता संपत नाही आणि भाषणांनी बेरोजगारी दूर होत नाही. त्यासाठी धोरण, प्रामाणिक अंमलबजावणी आणि सामाजिक मानसिकतेत परिवर्तन आवश्यक आहे. संविधानाने समानतेचा मार्ग दाखवून दिला आहे. आता सरकारने आणि समाजाने त्या मार्गावर प्रत्यक्ष चालण्याची वेळ आली आहे. कारण आधुनिक भारताची खरी कसोटी अंतराळातील झेप किंवा महामार्गांची लांबी नाही; तर त्या भारतातील प्रत्येक स्त्री किती स्वतंत्र आहे आणि प्रत्येक तरुणाच्या हाताला किती सन्मानाचे काम आहे, हीच आहे.

# संजीवनी हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य तपासणी



**जालना । प्रतिनिधी**

**संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, जालना येथे थायरॉईड नोड्यूल, गर्भाशयातील गाठी आणि व्हेरिकोज व्हेन्स याबाबत जनजागृती व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

या शिबिराचे उद्घाटन मेडिकल डायरेक्टर डॉ. बळीराम बागल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी डॉ. शिवदास मिरकड यांच्यासह हॉस्पिटलमधील डॉक्टर, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते फित कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरामध्ये इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट डॉ. प्रणव बंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आजारांची तपासणी व तज्ज्ञांचा सल्ला देण्यात आला. थायरॉईड नोड्यूलसाठी आधुनिक उपचार पद्धती, गर्भाशयातील गाठींसाठी आधुनिक व कमी त्रासदायक उपचार तसेच व्हेरिकोज व्हेन्ससंबंधी तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. थायरॉईड नोड्यूल, गर्भाशयातील गाठी किंवा पायांच्या शिरा फुगणे, पायात वेदना, जडपणा, सूज, खाज किंवा त्वचेचा रंग बदलणे अशा तक्रारी असलेल्या नागरिकांनी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन योग्य वेळी उपचार करावेत, असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, जालना यांच्या वतीने आयोजित या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# जेपीसी बँक आर्थिकदृष्ट्या अत्यंत सक्षम व भक्कम स्थितीत-चेअरमन सतीश पंच

## खेळीमेळीच्या वातावरण वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न सभासदांना लाभांश वाटपाचा निर्णय

**जालना । प्रतिनिधी**

**दि जालना पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेने आपल्या उत्कृष्ट व विश्वासार्ह कामकाजाच्या जोरावर १०९ वर्षे पूर्ण केली असून, बँक आर्थिकदृष्ट्या अत्यंत सक्षम व भक्कम स्थितीत आहे. बँकेची आर्थिक स्थिती आणखी मजबूत करण्यासाठी संचालक मंडळ ठेवी व कर्जात वृद्धी तसेच थकीत कर्जाच्या वसुलीवर विशेष भर देत आहे, असे प्रतिपादन बँकेचे चेअरमन सतीश सितारामजी पंच यांनी केले.**




जालना पीपल्स बँकेची ६८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळील श्री गुरुगणेश सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी चेअरमन सतीश पंच हे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बोलत होते.व्यासपीठावर बँकेचे व्हाईस चेअरमन किशोर देविदान, संचालक संजय भारतीया, सौ. सुनंदा नंदकिशोर अग्रवाल, सुनील चौधरी, ॲड. अनिल संचेती, राजकुमार दायमा, हितेंद्र शाह, अभय करवा, जयेश बाविशी, अनुराग अग्रवाल, सुनील बियाणी, सौ. वर्षा भक्कड, सुभाष वाघमारे, दीपक भुरेवाल, तज्ज्ञ संचालक सीए निखिल कैलासचंद बाहेती व बँकेचे महाव्यवस्थापक विजय जोशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना चेअरमन सतीश पंच पुढे म्हणाले की, दि. ३१ मार्चअखेर बँकेची एकूण आर्थिक स्थिती समाधानकारक राहिली असून बँकेने सातत्याने प्रगतीचा आलेख उंचावला आहे. चालू आर्थिक वर्षात बँकेने सभासदांना लाभांश वाटप करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. तसेच बँकेतील ५ लाख रुपयांपर्यंतच्या ठेवींना डीआयसीजीसीकडून नियमित विमा संरक्षण प्राप्त आहे. बँकेने ग्राहकांच्या सुविधेसाठी मोबाईल बँकिंग सेवा कार्यान्वित केली असून, अनेक खातेदार याचा लाभ घेत आहेत. उर्वरित बचत खातेधारक व नजरगहाण कर्जदारांनीही मोबाईल बँकिंग सुविधेचा लाभ घेण्यासाठी नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. सोबतच थकीत कर्जदारांनी आपले कर्जखाते तातडीने बेबाक करून बँकेच्या विकासात सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. दि. ३१ मार्च २०२६ अखेर एकूण ठेवी ७३ कोटी ३४ लाख,एकूण कर्जवाटप ३६ कोटी ४९ लाख रुपये असून, निव्वळ नफा : रु. १६ लाख ४९ हजार एवढा झाला आहे. नेट एनपीए शून्य टक्के, ग्रॉस एनपीए ६.९१ टक्के, सीआरएआर २३.४० टक्के, नेटवर्थ ११ कोटी ४९ लाख रुपये असून, ऑडिट वर्ग 'अ' वर्ग आहे, असे ते म्हणाले.

# बावनकुळेंच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा

## विजय वडेट्टीवारांचा महसूल मंत्र्यांवर कौतुकाचा वर्षाव

**मुंबई । प्रतिनिधी**

**तुमचा शब्द राज्यात खाली पडू दिला जात नाही शेतकऱ्यांसाठी धडाकेबाज निर्णय तुम्ही घेतलेत. तुमचं काम करण्याचं स्पीड जास्त आहे तुमच्या धडाकेबाज निर्णयामुळे महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना फायदा झालेला आहे. त्यामुळे विधानसभेत देखील तुमचं अभिनंदन केलं आहे, आपल्या माणसाची तारीफ आपणच केली पाहिजे, २०२९ ला आमचा नंबर लागला तर माझी तारीफ करायला सुद्धा आपण पाहिजे, तशी शक्यता मला वाटते, अशा शब्दात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर स्तुतीसुमनाचा वर्षाव केला. कोल्हापुरात तेल समाजाच्या मेळाव्यात विजय वडेट्टीवार यांनी बावनुकळे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.**

विजय वडेट्टीवार म्हणाले की, बावनकुळे साहेब तुम्ही सत्ताधारी आणि मी विरोधक तुमच्याने जे जमते ते तुम्ही करा पण प्रश्न सुटले पाहिजेत. काही प्रश्न विरोधकांना मांडावे लागतात. म्हणून बावनकुळे साहेबांनी ताकत लावावी समाजाचे प्रश्न सोडवावेत. बावनकुळे साहेबांच्या पाठीमागे समाजाचे प्रश्न सोडवायला मी खंबीरपणे उभा आहे. त्यांनी पुढे सांगितले की, तेली समाज हा विखुरलेला समाज आहे. तुम्ही कॅबिनेटमध्ये प्रश्न मांडा मी अधिवेशनात प्रश्न मांडतो, आपल्या समाजाचे प्रश्न सुटले पाहिजेत. आपल्या समाजाचे महामंडळ निर्माण झालं पाहिजे, हजारो कोटी रुपये मिळावेत, अशी मागणी केली. सध्या राज्यात तुम्ही दोन नंबरला आहात त्यामुळे तुमची जबाबदारी जास्त असल्याचे ते म्हणाले. वडेट्टीवार यांनी सांगितले की, विरोधी पक्षात तुम्ही नंबर एकवर आहात आणि तिथेही तुम्ही नंबर एक वरच आहात. २९ नंतर मात्र आमच्यासाठी काहीतरी काम ठेवा. समाजाच्या उन्नतीसाठी ७० कोटी रुपये मी मंजूर केले. आता तुम्ही सत्तरमध्ये शंभर कोटी रुपये घाला, म्हणजे समाजाचे प्रश्न सुटतील, संताजी महाराज यांचे प्रत्य४क जिल्ह्यात समाज भवन निर्माण व्हावं. यासाठी मोठा निधी मंजूर व्हावा. मागणारे आम्ही आहोत, देणारे तुम्ही आहात त्यामुळे हे काम होऊन जाईल, असे ते म्हणाले. आठवड्यातून दोन तास समाजाच्या विकासासाठी वेळ द्या, हा समाज तुम्हाला कधीही माझे टाकणार नाही. आपल्या समाजात सर्वात पहिला शिकलेला संत म्हणून जगणाडे महाराजांचा उल्लेख आहे. प्युअर तेल काढण्याचा आमचा पारंपारिक व्यवसाय आहे, आता तेच बंद करायला निघालेत. आमच्या समाजाने कधीही भेसळयुक्त तेल विकलेलं नाही. १०० ग्रॅमचे पाकीट येत नाही, गरीब माणसाला कुठून घ्यायचं असेल तर तो सुटे तेल घेईल. तुम्ही या संदर्भात ताबडतोब निर्णय घेऊन समाजाला न्याय मिळवून द्या, अशी मागणी त्यांनी बावनकुळे यांच्याकडे केली.

# जन्म-मृत्यू दाखल्याची प्रत आता १० ऐवजी २० रुपये

**मुंबई । प्रतिनिधी**

**जन्म-मृत्यू दाखला काढणा-या नागरिकांसाठी आता महत्त्वाची बातमी आहे. राज्य शासनाने जन्म-मृत्यू दाखल्यासाठी आकारण्यात येणा-या विविध शुल्कांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील अधिसूचना ३१ जुलै रोजी जारी करण्यात आली असून, त्यामुळे नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.**

आतापर्यंत जन्म किंवा मृत्यू दाखल्याची प्रत मिळवण्यासाठी १० रुपये शुल्क आकारले जात होते. मात्र, नव्या निर्णयानुसार हे शुल्क दुप्पट करून २० रुपये करण्यात आले आहे. अमरावती महापालिकेत सध्या दाखल्यासाठी १० रुपये शुल्क आकारले जात असून, शासनाच्या नव्या निर्णयानंतर लवकरच सुधारित दर लागू होण्याची शक्यता आहे. केवळ नियमित दाखल्याचे शुल्कच वाढलेले नाही, तर विलंबाने नोंदणी करणे, दाखल्याची दुसरी प्रत घेणे, जुन्या नोंदींचा शोध घेणे तसेच नावात दुरुस्ती करण्यासाठी आकारण्यात येणा-या शुल्कातही वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे विविध कारणांसाठी महापालिका किंवा संबंधित कार्यालयात दाखला काढण्यासाठी जाणा-या नागरिकांना पूर्वीपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागणार आहे.दरम्यान, जन्म-मृत्यूची नोंद वेळेत न झाल्यास त्यासाठीच्या प्रक्रियेतही महत्त्वाचे नियम कायम ठेवण्यात आले आहेत. एका वर्षापेक्षा अधिक विलंब झालेल्या नोंदीसाठी उपविभागीय दंडाधिका-यांची परवानगी आवश्यक राहणार आहे. तर दोन वर्षांनंतर जन्म किंवा मृत्यूची नोंद करण्यासाठी न्यायालयाचा आदेश घेणे बंधनकारक असणार आहे. त्यामुळे विलंब झालेल्या नोंदींसाठी नागरिकांना अतिरिक्त कागदपत्रे आणि प्रशासकीय प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे.

## पान १ वरून...

### मराठवाड्यात १.३२ लाख

कर्जमुक्तीचा लाभ मिळाला आहे. कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरण ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे ग्रीन लिस्टमध्ये पात्र ठरलेल्या, मात्र अद्याप आधार प्रमाणीकरण न केलेल्या शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. दरम्यान, उत्पादन खर्चातील वाढ, हवामानातील बदल आणि शेतीमालाच्या बाजारभावातील चढ-उतारामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत कर्जमुक्ती योजनेतून मिळणारा लाभ शेतकऱ्यांसाठी मोठा आर्थिक दिलासा ठरत आहे. मात्र, ग्रीन लिस्टमध्ये पात्र ठरलेल्या ६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या तुलनेत प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या कमी असल्याने उर्वरित पात्र शेतकऱ्यांची प्रक्रिया पूर्ण करणे हे शासन आणि प्रशासनासमोरील पुढील महत्त्वाचे आव्हान ठरणार आहे.

-------------

### पार्थ पवारांच्या घरी हाय

खडे बोल सुनावल्याची माहिती सूत्रांनी दिली. पक्षाच्या वाट्याला आलेल्या महामंडळांवर कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या करून राज्यभर संघटना सक्रिय करण्याचा सल्लाही त्यांनी दिल्याचे समजते. किशोर यांच्या या राजकीय मांडणीदरम्यान पक्षातील दिग्गज नेत्यांनी शांतपणे सर्व मुद्दे ऐकून घेतल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.बैठकीच्या समारोपावेळी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी, प्रशांत किशोर यांनी मांडलेल्या मुद्द्यांचा गांभीर्याने विचार करावा, मतभेद विसरून सर्वांनी कामाला लागावे, असा सल्ला नेत्यांना दिल्याचे समजते. मात्र, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रशांत किशोर बैठकीला उपस्थित नसल्याचे सांगितले. बैठकीनंतर तटकरे यांनी पक्षात फूट किंवा मतभेद असल्याच्या चर्चा निराधार असल्याचे सांगितले. 'आमच्यात कधीही दुरावा नव्हता', असे ते म्हणाले. लवकरच पक्षाचे राज्यस्तरीय चिंतन शिबिर आयोजित करण्याबाबतही या बैठकीत चर्चा झाली.गेल्या काही काळापासून राष्ट्रवादीत तरुणाई आणि ज्येष्ठ नेत्यांमधील नेतृत्व संघर्ष वाढत असल्याची चर्चा आहे. त्याच पार्श्वभूमीवर शनिवारी झालेल्या बैठकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. एरव्ही देवगिरी येथे होणारी मध्यवर्ती समितीची बैठक यावेळी खासदार पार्थ पवार यांच्या वरळी येथील निवासस्थानी झाली.सूत्रांच्या माहितीनुसार, किशोर यांनी बैठकीत पक्षातील ज्येष्ठांना कटू वास्तवाची जाणीव करून दिली. विपरीत परिस्थितीत विधानसभा निवडणुकीत चांगले यश मिळाल्यानंतर पक्ष सुस्तावल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. शहरांपासून राज्याच्या तळागाळापर्यंत पक्ष पोहोचविण्यासाठी ज्येष्ठांनी तरुणांसोबत काम करणे गरजेचे आहे. तरुणांचा सहभाग केवळ कार्यक्रमांत नव्हे, तर नेतृत्वातही दिसायला हवा, यावरही त्यांनी भर दिल्याचे समजते.

--------------

### मराठ्यांच्या विरोधात जाणं हे सामान्य

राजकारण राजकारण म्हणतात कोणत्या ओबीसींना राजकारणातल्या जागा खाऊ दिल्या? असा सवाल यावेळी जरांगे पाटील यांनी केला. कोणत्या मायक्रोओबीसींचा माणूस राजकारणात घुसवला? कोणता ओबीसी राजकारणाच्या पदावर तुम्ही बसवलं? सगळ्या गरीब मायक्रो ओबीसींच्या जागा यांनी हडपल्याचे जरांगे पाटील म्हणाले. तुम्हाला वाटतं ओबीसी अडाणी आहे, पण तो सगळ्यात हुशार आहे. ओबीसी मराठा समाजामध्ये कोणताही वाद नसल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना आरक्षण दिले पाहिजे, असं ओबीसींचं देखील म्हणणं आहे. एवढी साफ नियत ओबीसींची असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. नेत्यांना गरीब ओबीसींचं काही देणे-घेणे नाही, ते मराठ्यांच्या विरोधात फिरवत आहेत असे जरांगे म्हणाले. मी आंदोलनावर ठाम आहे. उदय सामंत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहेत, याबाबत विचारले असता जरांगे म्हणाले की, मला याबाबात माहिती नाही. त्यांचा काय उद्देश आहे हे माहित नसल्याचे जरांगे म्हणाले. दरम्यान, येत्या २९ ऑगस्टपासून मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटीत पुन्हा एकदा उपोणाला सुरुवात करणार आहे. त्यापूर्वी आज त्यांची १२३ गावातील सर्व प्रमुख मराठा बांधवांसोबत बैठक झाली. त्यानंतर ते बोलत होते.

-------------

### मनोज जरांगेंची लढाई आमच्याविरुद्ध

असा सवाल छगन भुजबळ यांनी विचारला. तसेच, महात्मा फुले यांचे वांगमय भाषण यावर आम्ही मागणी केली, त्यावर सरकार काम करत आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. मनोज जरांगे यांची लढाई आमच्या विरोधात नाही, त्यावर आम्ही काय बोलणार, सरकार त्यावर बोलतील आणि निर्णय घेतील, असे भुजबळ यांनी म्हटले. आम्ही जात जनगणना मागणी केली, त्यावर सरकार काम करत आहे. ओबीसीमध्ये किती जाती त्यावर सरकार निर्णय घेणार आहे. प्रत्येक राज्यात ओबीसींचे नाव त्यावर आम्ही मागणी केली तो शोध घेतला जात आहे. माळी समाज हा महाराष्ट्रात आहे, जेव्हा लढायचं तेव्हा मंत्रिपदाचा राजीनामा देऊन आम्ही राज्यात फिरलो. छगन भुजबळ हा काय घाबरला? असा सवाल नाही, असे म्हणत गरज होती तेव्हा आपण लढल्याचं भुजबळ यांनी म्हटलं. तर, सरकार आमच्यासोबत आहे म्हणून चर्चेतून आम्ही मार्ग काढत आहोत, असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

---------------

### तुकाराम मुंढेंच्या विरोधात व्यापारी

खाद्यतेलाच्या वापरामध्ये नियमांचे उल्लंघन केलं तर ७ वर्षांपासून आजन्म शिक्षा दरम्यान, नियमांचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई देखील करण्यात येणार आहे. खाद्यतेलाच्या वापरामध्ये नियमांचे उल्लंघन केलं तर ७ वर्षांपासून आजन्म शिक्षा आहे. भेसळ केल्यास १० लाखापर्यंत दंड आहे, दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींसाठी १० लाखापर्यंत दंड आहे, अशी माहितीही तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेत दिली होती. सुट्टे तेल विकत घेऊ नका, पॅकेज तेल आहे तर लेबल बघा, सील बंद आहे का चेक करा, त्याची मुदत बघा, एक्सपायरी डेट बघा. तळनीचं तेल वारंवार घरी सुद्धा वापरू नका आणि हॉटेलमध्ये सुद्धा वापरलं जात असेल तर तिथे खाऊ नका अशी माहिती देखील तुकाराम मुंढे यांनी दिली होती. हा इशू फक्त फसवणुकी पुरता मर्यादित नाही, आरोग्यावर याचा परिणाम होतोय. मेंदू विकार, कर्करोग, उच्च रक्तदाब असे आजार बळवतात, आरोग्याशी खेळणारे भेसळयुक्त तेल आहे, अशी माहिती देत आवाहन तुकाराम मुंढेंनी केलं होते. दरम्यान, सुट्टे खाद्यतेल विक्री बंदी निर्णयाच्या विरोधात राज्यातील व्यापाऱ्यांना तुकाराम मुंढेंच्या निर्णयाला विरोध केला आहे. आज यासंदर्भात व्यापाऱ्यांची नाशिकमध्ये बैठक पार पडली आहे.

----------------

### शाळा दत्तक घ्या एकनाथ शिंदेंच

आहेत, त्यांची स्वप्ने बदलत आहेत. त्यानुसार आपल्या शाळाही बदलल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाला भविष्यातील संधी आणि आव्हानांसाठी तयार करणारी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि भविष्यवेधी शिक्षणव्यवस्था आपण निर्माण केली पाहिजे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.या कृति आराखड्यात शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षकांना सोबत घेणे, शिक्षकांसाठी प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि प्रेरणादायी उपक्रम राबवणे तसेच उत्कृष्ट काम करणा-या शिक्षकांना प्रोत्साहन व योग्य सन्मान देणे, यावर विशेष भर देण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या विविध शिक्षणविषयक योजनांची महाराष्ट्रात प्रभावी आणि गतिमान अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही एकनाथ शिंदे यांनी दिल्या.शिक्षण म्हणजे केवळ अभ्यासक्रम आणि परीक्षा नसून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि भावनिक विकास हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू असला पाहिजे, असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. त्यासाठी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, पोषण, मध्यान्ह भोजन योजनेचा आढावा तसेच विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य आणि भावनिक स्वास्थ्यासाठी आवश्यक उपक्रम यांना अधिक महत्त्व देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.शाळांच्या विकासात पालक, माजी विद्यार्थी आणि स्थानिक समाजाची सक्रिय भागीदारी वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. शिक्षण विभागाकडून सुरू असलेले चांगले उपक्रम आणि त्यातून घडणारे सकारात्मक बदल जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे निर्देशही एकनाथ शिंदे यांनी दिले.आपल्या मतदारसंघातील शाळांच्या विकासासाठी आमदार आणि खासदारांनी शाळा दत्तक घेऊन उपलब्ध निधी आणि स्थानिक संसाधनांच्या माध्यमातून योगदान द्यावे, यासाठी त्यांना आवाहन करण्यात येणार आहे.

-------------

### वाचाळवीर आमदारांना

वेळीच आवरावे. अशा प्रक्षोभक वक्तव्यांमुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. आणि जर असे झाले, तर यामध्ये नाहक सर्वसामान्य आणि निष्पाप माणूस भरडला जाईल, अशी भीती सुळे यांनी व्यक्त केली आहे.महाराष्ट्राच्या राजकीय आणि पुरोगामी संस्कृतीची आठवण करून देताना सुळे यांनी सत्ताधा-यांना थेट इशारा दिला. हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे. हा राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र आहे. या शिवरायांच्या महाराष्ट्रात अशी गुन्हेगारी प्रवृत्तीची आणि दडपशाहीची भाषा अजिबात खपवून घेतली जाणार नाही, असे खडे बोल सुप्रिया सुळे यांनी सुनावले आहेत.

---------------

### राज्यात साथीच्या

९३ रुग्ण आढळले आहेत. विशेष म्हणजे, मलेरिया आणि डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मुंबई आघाडीवर आहे. सध्या पावसाळा सुरू असून विविध साथीच्या रोगांना पोषक वातावरण निर्माण झाले आहे. डासांची उत्पत्ती वाढली असून डेंग्यू, मलेरियासारखे आजार बळावले आहेत. सध्या मलेरिया आजारांमध्ये वाढ होत आहे. २०२५ मध्ये २१ ऑगस्टअखेर राज्यात मलेरियाचे १३ हजार ६५८ रुग्ण आढळले होते. यंदा ही संख्या १२ हजार २१९ वर आली आहे. मलेरियामुळे यंदा दोन मृत्यू झाले असून, एकूण रुग्णांपैकी ४ हजार ३९३ रुग्ण पी.एफ. प्रकारातील आहेत.मात्र, डेंग्यूच्या बाबतीत परिस्थिती उलट आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत ४ हजार ३४४ डेंग्यू रुग्णांची नोंद झाली होती. यंदा हा आकडा ६ हजार ३७९ वर पोहोचला आहे. डेंग्यूमुळे यंदा तीन मृत्यू झाले आहेत. चिकुनगुनियाचे १ हजार ९३ रुग्ण आढळले असून, या आजारामुळे अद्याप एकही मृत्यू झालेला नाही.

-------------

### साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी

१५ दिवसांच्या गरजेपेक्षा जास्त साखरेचा साठा करू शकणार नाहीत.यापूर्वी, सरकारने व्यवसायांसाठी ३० दिवसांच्या साखर साठ्याची मर्यादा निश्चित केली होती. मात्र, किमतींमध्ये सतत होणाऱ्या वाढीमुळे, ही मर्यादा आणखी कमी करून १५ दिवसांवर आणली आहे. याचे कारण असे की, सणासुदीच्या काळात साखरेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते आणि बिस्किट, मिठाई व कन्फेक्शनरी उत्पादक अनेकदा आगाऊ साठा करून ठेवतात. सरकार खरेदीदारांच्या साखर खरेदी आणि वापराशी संबंधित माहितीची पडताळणी करेल. यासाठी साखर कारखान्यांनी मोठ्या खरेदीदारांना केलेली विक्री आणि व्यापाऱ्यांच्या जीएसटी रिटर्नमध्ये नोंदवलेली माहिती वापरली जाईल. तसेच साखरेशी संबंधित एचएसएन कोडची माहिती तपासली जाईल. साखर कारखान्यांकडून झालेल्या विक्रीच्या नोंदीही तपासल्या जातील. खरेदीदाराने खरेदी केलेल्या साखरेचे प्रमाण आणि तिचा वापर देखील निश्चित केला जाईल. या माहितीच्या आधारे, सरकार अतिरिक्त साठा बाळगणाऱ्या व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवेल. दरम्यान, नियमाचा भंग केल्यास कारवाई देखील करण्यात येणार आहे.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६


थोडक्यात



पिंपळवंडी:-कुंभारदरा येथे श्री.तुळजाभवानी, येडेश्वरी महायज्ञप्रसंगी ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज, ह.भ.प.परमानंदभारती महाराज,सुंदर पवार (बिल्डर),युवा नेते ज्ञानेश्वर पवार,दादा पवार,अशोक पवार,सचिन कुलकर्णी,संजय गाडे, मंगल पवार,सौ.राणी पवार,मिरा शिंदे,भारती पवार,भाऊ पवार, सखाराम शिंदे,बाबू पवार, भुमिकन्या डॉ.सायली पवार, दैवशाला सोंडगे व गांवकरी.

## बीडमध्ये ३०-३१ ऑगस्टला एसएनडीटी विद्यापीठाचा युवा महोत्सव

बीड । प्रतिनिधी

एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित 'उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सव २०२६' यंदा तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे दि. ३० आणि ३१ ऑगस्ट रोजी पार पडणार आहे. माननीय कुलगुरू प्रो. डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या मार्गदर्शनाखाली साकारणारा हा भव्य युवा महोत्सव मराठवाड्यात प्रथमच आयोजित होत असून, या ऐतिहासिक सोहळ्याच्या यजमानपदाचा मान बीडला मिळाला आहे.

**२८ कलाप्रकारांमध्ये रंगणार चुरस; मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील महाविद्यालयांचा सहभाग**

या दोन दिवसीय महोत्सवात मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील एसएनडीटी महिला विद्यापीठाशी संलग्न जवळपास १०० महाविद्यालयांमधील विद्यार्थिनी-कलाकार सहभागी होणार आहेत. विद्यार्थिनींच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या महोत्सवात भव्य शोभायात्रेसह संगीत, नृत्य, साहित्य, नाट्य आणि ललित कला अशा विविध क्षेत्रांतील २८ कलाप्रकारांच्या स्पर्धा रंगणार आहेत.

महोत्सवाचा उद्घाटन सोहळा रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता रामकृष्ण लॉन्स येथे होणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख प्रो. डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, एसएनडीटी महिला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थान भूषवतील. यावेळी विद्यापीठ प्रतिनिधी डॉ. नितीन एस. प्रभुतेंडोलकर, प्रमुख पाहुणे प्रा. सुनील मगरे, डॉ. साईनाथ बनसोडे तसेच प्रा. प्रदीप रोडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

महोत्सवातील विविध स्पर्धांमध्ये विजयी ठरणाऱ्या विद्यार्थिनींना प्रसिद्ध अभिनेते व विनोदी कलाकार गौरव मोरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. महाराष्ट्राची हास्यजत्रा या लोकप्रिय कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेल्या गौरव मोरे यांच्या उपस्थितीमुळे महोत्सवाला सांस्कृतिक वैभवाबरोबरच मनोरंजनाचीही विशेष रंगत लाभणार आहे. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे तसेच सांस्कृतिक प्रमुख व कार्यक्रमाच्या संयोजक प्रा.विद्या आवघाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग आणि कर्मचारी विशेष परिश्रम घेत आहेत. महोत्सवासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून, सहभागी विद्यार्थिनींच्या स्वागतापासून ते स्पर्धांचे नियोजन, निवास, भोजन आणि इतर व्यवस्थांची जय्यत तयारी करण्यात येत आहे.

# चकलांबा येथील विविध योजना व विकास कामातील गैरप्रकाराची कठोर चौकशी करा

बीड । प्रतिनिधी

**गेवराई तालुक्यातील चकलांबा ग्रामपंचायत कार्यालय चकलांबा अंतर्गत सन २०१३ ते २०२६ या कालावधीत विविध निधी व योजनांतर्गत झालेल्या विकासकामांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी चकलांबा ग्रामपंचायत सदस्या सौ. गयाबाई बाळासाहेब खेडकर यांनी केली आहे.**

या संदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामपंचायत कार्यालय चकलांबा अंतर्गत सन २०१३ ते २०२६ या कालावधीत वित्त आयोग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना तसेच विविध शासकीय निधी व योजनांच्या माध्यमातून अनेक सार्वजनिक विकासकामे करण्यात आलेली आहेत. सदर कामांमध्ये वित्त आयोगाचा निधी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१३ ते २०२६ या कालावधीत झालेली कामे, ११ अंगणवाडी इमारती कामे, खासदार निधी, आमदार निधी, अल्पसंख्याक विकास निधी, तांडा वस्ती विकास निधी, दलित वस्ती सुधार योजना/निधी तसेच ग्रामपंचायतमार्फत राबविण्यात आलेल्या इतर सर्व शासकीय योजना व निधीतून झालेल्या सार्वजनिक कामांचा समावेश आहे.सदर सन २०१३ ते २०२६ या कालावधीत वित्त आयोगाच्या निधीतून झालेल्या सर्व कामांची वर्षनिहाय व कामनिहाय चौकशी करण्यात यावी. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जानेवारी २०१३ ते जुलै २०२६ या कालावधीत झालेल्या सर्व सार्वजनिक कामांची चौकशी करण्यात यावी. ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या ११ अंगणवाडीच्या कामांची स्वतंत्रपणे चौकशी करून मंजुर निधी, प्रत्यक्ष खर्च, कामाची गुणवत्ता व न झालेली कामे, बोगस बिले,सद्यस्थिती तपासण्यात यावी. खासदार निधी व आमदार निधीतून



**ग्रा.पं.सदस्या सौ. गयाबाई खेडकर यांची मागणी**

ग्रामपंचायत चकलांबा अंतर्गत झालेल्या सर्व कामांची चौकशी करण्यात यावी. अल्पसंख्याक विकास निधीतून झालेल्या सर्व कामांची निधी, मंजुरी, खर्च व प्रत्यक्ष कामाच्या आधारे तपासणी, तांडा वस्ती विकास निधीतून झालेली कामे,दलित वस्ती सुधार योजना, निधीतील कामे, आमदार व खासदार निधीतून झालेल्या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वस्तुनिष्ठ चौकशी करण्यात यावी.वरील सर्व कामांबाबत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रक, कामाचे आदेश, मोजमाप पुस्तिका, मस्टर रोल, बिल-वाउचर, देयके, ठराव व संबंधित सर्व अभिलेखांची तपासणी करण्यात यावी.मंजूर कामे प्रत्यक्षात पूर्ण झाली आहेत किंवा नाहीत, कामाच्या अंदाजपत्रकानुसार व मंजूर गुणवत्तेनुसार काम झाले आहे किंवा नाही, याची प्रत्यक्ष स्थळ पाहणी व पंचनामा करण्यात यावा. निधीचा गैरवापर, आर्थिक अनियमितता, खोटी व अपूर्ण कामे, बनावट कागदपत्रे किंवा शासन निधीचा अपहार आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी अथवा जबाबदार व्यक्तींवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, सदर चौकशी स्वतंत्र चौकशी समितीमार्फत करून चौकशीचा सविस्तर अहवाल तयार करण्यात यावा. चौकशीत दोषी आढळणाऱ्या व्यक्तींकडून शासन निधीची वसुली करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणी गांभीर्याने दखल घेऊन जानेवारी २०१३ ते जुलै २०२६ या कालावधीतील वित्त आयोग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, ११ अंगणवाडी, खासदार निधी, आमदार निधी, अल्पसंख्याक निधी, तांडा वस्ती, दलित वस्ती तसेच इतर सर्व शासकीय निधी व योजनांतर्गत झालेल्या कामांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असे ग्रामपंचायत सदस्य सौ.गयाबाई बाळासाहेब खेडकर यांनी म्हटले आहे. निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी, बीड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती गेवराई, आणि तहसीलदार, गेवराई यांना देण्यात आल्या आहेत.


## पाटोद्यात महावितरणची मनमानी; ४२३० वरून थेट ६७५३ रिडिंग नेत ग्राहकाला ५५ हजारांचा शॉक

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील महावितरणाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून, येथील रस्ता गल्ली, लक्ष्मी चौक परिसरातील एका घरगुती वीज ग्राहकाला महावितरणने चक्क ५५ हजार ६० रुपयांचे अवाढव्य बिल पाठवले आहे. एका महिन्याच्या अंतरात आलेल्या या भरमसाठ बिलामुळे ग्राहकासह परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.

विजया सिताराम नागरगोजे असे या फटका बसलेल्या घरगुती वीज ग्राहकाचे नाव आहे. त्यांच्या घरगुती वापराच्या मीटरचे जुलै २०२६ महिन्याचे बिल अवघे १९० रुपये आले होते. मात्र, पुढच्याच महिन्यात म्हणजेच ऑगस्ट २०२६ च्या बिलामध्ये ही रक्कम थेट ५५,०६० रुपयांवर पोहोचली आहे. एका महिन्याच्या फरकात आलेली ही अवाढव्य रक्कम पाहून नागरिक अक्षरशः चक्रावून गेले आहेत.

रिडिंगमधील मोठी विसंगती आणि संशय




उपलब्ध कागदपत्रांनुसार, मीटर रिडिंग घेताना मोठा सावळागोंधळ झाल्याचे स्पष्ट होत आहे. जुलै २०२६ मध्ये मीटरचे रिडिंग ४२३० होते. ऑगस्ट २०२६ मध्ये हे रिडिंग थेट ६७५३ वर पोहोचल्याचे दाखवण्यात आले आहे. एकाच महिन्यात एवढी मोठी तफावत कशी आली, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, ही मीटर रिडिंगमधील चूक नसून महावितरणाचा निव्वळ निष्काळजीपणा असल्याचा आरोप होत आहे.

नागरिकांचा रोष आणि आंदोलनाचा इशारा

या प्रकाराबाबत स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत येथील यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हातात आलेले हजारो रुपयांचे बिल पाहून, आमच्या घरात काय कारखाना चालतो का? असा संतप्त सवाल नागरिकांनी विचारला आहे. पाटोदा महावितरण म्हणजे सामान्य ग्राहकांना लुटण्याचा कारखाना झाला आहे का, असा संताप व्यक्त केला जात आहे. दिवसाढवळ्या चाललेली ही लूट थांबवावी आणि महावितरण प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन दुरुस्त बिल द्यावे, अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

## चकलांबा जि.प. माध्यमिक शाळेच्या व्यवस्थापन समिती; अध्यक्षपदी सौ.स्वाती खेडकर, उपाध्यक्षपदी तांगडे, टाक

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चकलांबा शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी- सौ.स्वाती केशव खेडकर यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी- दिनकर मुरलीधर तांगडे आणि सौ. मोनिका अशोक टाक यांची निवड झाली आहे.

शनिवार दि.२२ रोजी घोषित करण्यात आल्याप्रमाणे शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी पालकामधून मतदान घेण्यात आले. निवडून आलेल्या सदस्यांमधून अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडण्यात आले. शालेय व्यवस्थापन समिती



सदस्यांमध्ये वर्ग निहाय निवडून आलेले पालक सदस्य याप्रमाणे आहेत. अमित कुमार गणेश टाक (इ. पहिली) श्रीमती जिजाबाई आदिनाथ खेडकर इ. दुसरी), श्रीमती मोनिका अशोक (इ. तिसरी), नारायण राधाकिसन आव्हाड (इ. चौथी), श्रीमती सना शकील शेख (इ. पाचवी), श्रीमती स्वाती केशव खेडकर (इ.सहावी) श्रीमती सरला नारायण गुंजाळ, संदीप परसराम पवार (इ.सातवी - अ), श्रीमती छाया महादेव कांबळे (सातवी- ब) संदीपकुमार शिवनाथ गरकळ (आठवी- अ) श्रीमती विनी संजय काळे (आठवी- ब) स्वयब महबूद सय्यद (नववी- अ), दिनकर मुरलीधर तांगडे नववी- ब), लक्ष्मण बबनराव शेळके (नववी- क), सोमनाथ गुलाब गळाटे (दहावी- अ), अर्जुन रामभाऊ शिंदे (दहावी- ब), श्रीमती मुद्रका बबन गाडीवान ( दहावी- क) नवनियुक्त अध्यक्ष उपाध्यक्ष आणि शालेय समिती सदस्यांचे शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा मुख्याध्यापक भागवत गरकळ आणि त्यांच्या सहकारी शिक्षक वृंदांनी स्वागत केले.

यावेळी गावातील मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत सदस्य आदी उपस्थित होते.

## श्रीमंत दत्तात्रय महाराज गिरी यांचा 'आध्यात्मिक समाज गौरव पुरस्कार'ने सन्मान

माजलगाव । प्रतिनिधी

शिववंशीय दशानाम गोसावी समाज संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा यांच्या वतीने आयोजित भव्य त्रिसूत्री महाअधिवेशनात दशानाम गोसावी समाजाचे बीड जिल्हाध्यक्ष श्रीमंत दत्तात्रय महाराज गिरी यांचा 'आध्यात्मिक समाज गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला.



समाजाच्या आध्यात्मिक, सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत हा गौरव करण्यात आला. महाअधिवेशनाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणत सामाजिक एकोपा, आध्यात्मिक संस्कार आणि समाजहिताच्या उपक्रमांना चालना देण्याचा संदेश देण्यात आला. शिववंशीय दशानाम गोसावी समाज संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा यांच्या वतीने आयोजित या महाअधिवेशनात श्रीमंत दत्तात्रय महाराज गिरी यांचा सन्मान झाल्याने समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या कार्याबद्दल उपस्थित मान्यवर व समाजबांधवांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक व आध्यात्मिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सुलतानपूर (माळेवाडी) येथे साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात

माजलगांव । प्रतिनिधी

सुलतानपूर (माळेवाडी) येथे साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री आठ वाजता मोठ्या उत्साहात व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त आण्णा नरवडे यांच्या हस्ते झाले .तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्यमान भारत मिशनचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे लहुजी विद्रोही सेनेचे अध्यक्ष भास्कर नाना शिंदे, अजय राऊत, तुकाराम नावडकर, अॅड. शिवाजी निंबाळकर, कोंडीबा लोंढे, संतोष भाऊ नरवडे, बंडू खांडेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जयंतीनिमित्त पुणे येथील प्रसिद्ध गायिका गायत्री साळवे-पुणेकर यांनी डॉ. अण्णाभाऊ साठे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आद्यक्रांतिकारक लहुजी साळवे यांच्या जीवनकार्यावर आधारित



बहारदार गीतांचा जंगी कार्यक्रम सादर केला. या सांस्कृतिक कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित (नाना) लोखंडे यांनी केले.

अण्णाभाऊंचे विचार आणि आरक्षणाच्या लढ्याचा भास्कर शिंदेंकडून उल्लेख यावेळी बोलताना भास्कर नाना शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज, आद्यक्रांतिकारक लहुजी साळवे, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव केला. अण्णाभाऊ साठे यांनी वंचित, कष्टकरी आणि सामान्य माणसाच्या वेदनांना आपल्या साहित्याच्या माध्यमातून वाचा फोडल्याचे त्यांनी सांगितले.

मातंग समाजाच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी महाराष्ट्रात आंदोलन सुरू असून, या मागणीसाठी सर्व संघटना व समाजबांधवांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले. माजलगांव तालुक्यातही या मागणीच्या समर्थनार्थ मोठा मोर्चा काढण्यात येणार असून, त्यात महिला व युवकांसह समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिंदे यांनी केले.

यावेळी त्यांनी डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी समाजातील एका गरजू व्यक्तीला वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. समाजातील अडचणीच्या काळात मदतीला धावून येणाऱ्या व्यक्तींची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अण्णाभाऊंचे साहित्य जगभर पोहोचले : डॉ. ओमप्रकाश शेटे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या भाषणात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव केला. अण्णाभाऊंच्या साहित्याला देश-विदेशात मोठी मान्यता मिळाली असून त्यांच्या साहित्याचे विविध भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. 'फकिरा'सारख्या कादंबरीतून त्यांनी सामान्य माणसाच्या संघर्षाला नायकत्व दिले, असे त्यांनी सांगितले. अण्णाभाऊंचे औपचारिक शिक्षण अल्प असतानाही त्यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर मराठी साहित्याला जागतिक स्तरावर नेले. त्यांच्या साहित्याची दखल रशियासह परदेशातही घेतली गेली, हा त्यांच्या प्रतिभेचा मोठा सन्मान असल्याचे डॉ. शेटे यांनी नमूद केले. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा, अशी भावना व्यक्त करताना डॉ. शेटे म्हणाले की, अण्णाभाऊंचे विचार आणि साहित्य आजच्या पिढीने आत्मसात करून समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. जयंतीच्या माध्यमातून केवळ उत्सव न करता अण्णाभाऊंचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जयंती कमिटीचे अध्यक्ष महादेव लोखंडे, उपाध्यक्ष विशाल थोरात, सचिव कृष्णा (तात्या) लोखंडे, सहसचिव रमेश लोखंडे, कोषाध्यक्ष संतोष लोखंडे, सल्लागार लखन लोखंडे, सहसल्लागार विकास थोरात, संघटक अशोक क्षिरसागर, सहसंघटक साजन लोखंडे, सहकोषाध्यक्ष अरविंद थोरात तसेच अनिल लोखंडे, ऋषिकेश थोरात, लखन खरात, गोरख लोखंडे, प्रविण लोखंडे, ज्ञानेश्वर थोरात, राहुल लोखंडे, अविनाश लोखंडे, दादा धोत्रे, पष्णु लोखंडे, कृष्णा लोखंडे, राजू नाडे, प्रकाश लोखंडे, करण लोखंडे, सुरज उमाप यांच्यासह जयंती कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे आयोजक ग्रामपंचायत सदस्य दत्ता लोखंडे होते. सुलतानपूर (माळेवाडी) येथील नागरिक, महिला, युवक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती उत्सवात सहभागी झाले.

पान ६ वरुन...

### जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित

वाटचाल अधिक सक्षम, सकारात्मक आणि समाजाभिमुख होईल, असा विश्वास आ. सुरेश धस यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रसंगी माजी अध्यक्ष अॅड. रोहिदास येवले, माजी सचिव अॅड. शहादेव ननवरे, मावळते अध्यक्ष ड. सुभाष पिसोरे, तसेच ड. राजू शिंदे, अॅड. वाय. पी. अनवणे यांच्यासह अन्य मान्यवर वकील उपस्थित होते.

### राजनिल राजेश इंगोले राज्यात

प्रसाद वटकरखेडे, प्रसाद शिंदे, पार्थ सवर्णे, काव्या उमपाड, सौमित्र रामदासी, कार्तिक भुते, नव्यता म्हाजन, दीपक काकटकर, मानसी कपसे, सोहम कामाजी, शहाराश इरलापल्ली, प्रणत देशपांडे, प्रांजल भुते आणि मनोज बल्लाळकर यांनी यश प्राप्त केले. तर इयत्ता आठवीतून सूरजकमल राठोड, पार्थ कदम, साशंक चांदे, साईक शिंदे, शौर्य सोळंके, श्रेया मुंडे, यशराज मस्के आणि विराट शिंदे हे ८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मार्गदर्शिका रेखा महाजन, पूनम महाजन - राव, संस्थापक अध्यक्षा मंगला कुलकर्णी, कार्याध्यक्षा कमलाकर कोपले, संस्थापक सचिव शैलेश कुलकर्णी, प्रा.योगेश कुलकर्णी, मुख्याध्यापिका गीतांजली कुलकर्णी यांनी स्वागत केले.

### किसन बाबा यांची नवनाथ बाबा

जगामध्ये जी माणसं स्वतःला छोटी समजतात तीच माणसं जगामध्ये आहेत खूप मोठी असतात परंतु ते जगाला भासू देत नाहीत तसं सदगुरू किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांची उंच अगणित आहे परंतु ते जगाला भासू देत नाही दाखवत नाही हेच साधूंच मोठेपण आहे असे शास्त्री महाराज म्हणाले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवारी द्वितीय कीर्तन सेवा ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री यांची संपन्न झाली यावेळी जिल्हाभरातील ख्यातनाम गायक मृदंगाचार्य गायनाचार्य वादनाचार्य तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बेलुरा येथे तुती लागवडीबाबत

होत असून, योग्य नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास या व्यवसायातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. वरिष्ठ शास्त्रज्ञ वीर शेट्टी यांनी तुती लागवडीची शास्त्रीय पद्धत, झाडांची निगा, रेशीम किड्यांचे संगोपन आणि उत्पादन वाढीसाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी रेशीम शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून उत्पादन व गुणवत्ता वाढवावी, असे त्यांनी सांगितले.रेशीम शेतीच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळत असून, बेलुरा परिसरातही तुती लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठी रेशीम विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. कार्यक्रमादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी तज्ज्ञांशी संवाद साधत तुती लागवड व रेशीम उत्पादनाबाबत विविध प्रश्नांची माहिती करून घेतली.

### गेवराईजवळ अवैध वाळू वाहतुकीवर

असा एकूण ३५ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ५०३/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

कारवाई करणारे पथक

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, पोलीस अंमलदार मनोज परजणे, बबन सलगर व अश्पाक सय्यद यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

### गावचा कट्टा अन् जुन्या

शिदोरी आहे. त्यांच्या अनुभवातून आजच्या पिढीला जीवन जगण्याचे अनेक मौल्यवान धडे मिळू शकतात. काळ बदलत आहे आणि ही जुनी पिढीही हळूहळू कमी होत आहे. त्यामुळे गावच्या कट्ट्यावरची ही माणसं आणि त्यांच्या गप्पा भविष्यात आठवणींचाच एक भाग बनण्याची शक्यता आहे. म्हणून वेळ मिळेल तेव्हा ज्येष्ठ मंडळींसोबत काही क्षण घालवणे,त्यांच्या अनुभवांचे बोलणे ऐकणे आणि त्यांच्या आठवणी जाणून घेणे गरजेचे आहे. त्यांच्या सहवासातून जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळते.त्यांच्या साध्या जीवनशैलीतून समाधान, संयम आणि माणुसकीचा खरा अर्थ समजतो. जुनं ते सोनं... कारण माणसं काळाच्या ओघात निघून जातात; मात्र त्यांचे संस्कार, आठवणी आणि अनुभव कायम आपल्या सोबत राहतात.

### 'पदाधिकारी विकासासाठी

नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचा दावा त्यांनी केला. त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेच्या प्रश्नांवरही त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याऐवजी विकासकामांच्या नावाखाली आर्थिक व्यवहारांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

"चोर चोर खलेरे भाई..." असा टोला लगावत शिराळे पाटील यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवरही भाष्य केले. पदाधिकारी आणि सत्ताधारी गटातील अंतर्गत संघर्षाचा परिणाम शहराच्या विकासावर होत असेल, तर त्याची किंमत सर्वसामान्य नागरिकांना मोजावी लागते, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या आरोपांमुळे बीड नगरपरिषदेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील विकासकामे, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि निधीच्या वापराबाबत प्रशासनाने पारदर्शक माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.मात्र, शिराळे पाटील यांनी केलेल्या आरोपांबाबत नगरपरिषद प्रशासन व संबंधित पदाधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यांची बाजू समोर आल्यानंतरच या आरोपांचे पूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे.

# पीकस्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत

पुणे / प्रतिनिधी

आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करून पीक उत्पादकता वाढविणाऱ्या आणि प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत खरीप हंगामासाठी पीकस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

यंदापासून पीकस्पर्धेची अर्ज प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली असून, कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर 'पीक स्पर्धा नोंदणी' सुविधा उपलब्ध आहे. भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या नऊ खरीप पिकांचा स्पर्धेत समावेश आहे. सर्वसाधारण तसेच आदिवासी गटासाठी तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी शेतकऱ्याच्या स्वतःच्या नावावर जमीन असून ती



स्वतः कसणे आवश्यक आहे. भातासाठी किमान २० गुंठे, तर इतर पिकांसाठी किमान ४० गुंठे क्षेत्रावर सलग लागवड असणे गरजेचे आहे. एका शेतकऱ्याला एकापेक्षा अधिक पिकांसाठी सहभागी होता येईल.

सर्वसाधारण गटासाठी प्रति पीक ३०० रुपये, तर आदिवासी गटासाठी १५० रुपये प्रवेश शुल्क आहे. तालुकास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये, जिल्हास्तरावर १० हजार, ७ हजार व ५ हजार रुपये, तर राज्यस्तरावर ५० हजार, ४० हजार व ३० हजार रुपये बक्षिसे दिली जाणार आहेत.

अर्जासाठी फार्मर आयडी, प्रवेश शुल्काचे चलन, आदिवासी शेतकऱ्यांसाठी जात प्रमाणपत्र आणि बँक पासबुक अथवा चेकच्या पहिल्या पानाची प्रत आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या संकेतस्थळावरून अर्ज करावा. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मेथी पिकातून अधिक उत्पादन घेण्यासाठी व्यवस्थापन



मेंथी पिकाची योग्य काळजी न घेतल्याने मेंथीच्या पानांवर तपकिरी रंगाचे डाग पडतात. हे डाग मेंथाच्या पानांचा नाश करतात. या रोगामुळे पाने पिवळी पडू लागतात व सुकून पडतात. हे टाळण्यासाठी शेतकऱ्याने २ किलो मॅन्कोझेब ७५ डब्ल्यूपी ८००-१००० लिटर पाण्यात विरघळवून प्रति हेक्टरी फवारणी करावी.शेतकरी आता पारंपारिक शेती सोडून आधुनिक शेतीचा अवलंब करून शेतीतून अधिक नफा मिळवत आहेत. पाहिले तर या पिकांची मागणी देशांतर्गत आणि परदेशी बाजारपेठेत बऱ्यापैकी आहे. या क्रमाने देशातील शेतकरी त्यांच्या शेतात विविध प्रकारची पिके घेत आहेत. या पिकांमध्ये मेंथा पिकाचाही समावेश होतो, जो शेतकऱ्यांना खूप फायदेशीर आहे. अलीकडेच कृषी तज्ज्ञांनी मेंथी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण सल्ला दिला आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेत अधिक नफा मिळू शकेल.मेंथी पिकावर होणाऱ्या रोगांपासून संरक्षण : मेंथी ही पुदिन्यासारखी दिसणारी वनस्पती आहे, जी अनेक कामांसाठी वापरली जाते. मेंथी पिकाच्या वेळी शेतकऱ्यांनी दीमकांचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी. कारण या पिकावर दीमकाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता खूप जास्त आहे. जर दीमक एकदा पिकावर प्रादुर्भाव करत असेल तर ते संपूर्ण पीक खराब करू शकतात. याला प्रतिबंध करण्यासाठी शेतकऱ्यांनी पिकावर २.५ लिटर क्लोरपायरीफॉस प्रति हेक्टरी फवारणी करावी. याशिवाय केसाळ सुरवंट देखील मेंथी पिकावर प्रादुर्भाव करतात ज्यामुळे पिकाची पाने नष्ट होतात. या किडीपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी ५०० एम. डायक्लोरव्हास ७००-८०० लिटर पाण्यात विरघळवून पिकावर पूर्णपणे फवारणी करावी.

मेथी पानांची सुरक्षितता : पिकाची योग्य काळजी न घेतल्याने मेथीच्या पानांवर तपकिरी रंगाचे डाग पडतात. हे डाग मेंथाच्या पानांचा नाश करतात. या रोगामुळे पाने पिवळी पडू लागतात व सुकून पडतात. हे टाळण्यासाठी शेतकऱ्याने २ किलो मॅन्कोझेब ७५ डब्ल्यूपी ८००-१००० लिटर पाण्यात विरघळवून प्रति हेक्टरी फवारणी करावी.

रोपे लावताना या गोष्टी लक्षात ठेवा : मेथी पिकाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्याने लागवड करताना काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. उदाहरणार्थ, प्रथम झाडाला ०.१ टक्के कार्बेन्डाझिमच्या द्रावणात सुमारे १५-२० मिनिटे बुडवा. त्यानंतरच शेतात रोप लावावे. असे केल्याने पिकाची वाढ चांगली होते आणि रोगाची शक्यताही कमी होते.

# ऐन काढणीच्या तोंडावर संत्रा-मोसंबीची फळगळ; देठ सुकीने शेतकऱ्यांची चिंता वाढवली

संत्रा-मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. पावसाची तूट, वाढते तापमान आणि पाण्याच्या ताणामुळे बागांमध्ये देठ सुकीचा प्रादुर्भाव वाढल्याचे शेतकरी सांगत आहेत. त्यामुळे ऐन उत्पादनाच्या काळात मोठ्या प्रमाणावर फळगळ सुरू झाली असून, अनेक बागांमध्ये झाडाखाली गळलेल्या संत्रा-मोसंबीचा खच दिसत आहे.वर्षभर बागेची मशागत, खत व्यवस्थापन, औषध फवारणी आणि सिंचनावर खर्च करून फळे काढणीला येण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक गळून पडत असल्याने आर्थिक गणित बिघडण्याची भीती निर्माण झाली आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जमिनीतील ओलावा घटला आहे. त्यातच वाढत्या तापमानामुळे संत्रा आणि मोसंबीच्या झाडांवर पाण्याचा व उष्णतेचा ताण वाढला आहे. या प्रतिकूल हवामानाचा परिणाम फळांच्या वाढीवर होत असून, फळगळ वाढत असल्याचे दिसून येत आहे. विशेषतः फळधारणा झाल्यानंतर फळे झाडावर टिकवून ठेवण्यासाठी झाडाला पुरेसा ओलावा मिळणे महत्त्वाचे असते. मात्र, पाण्याची उपलब्धता कमी आणि उष्णतेचा ताण अधिक असल्याने बागांमध्ये समस्या गंभीर होत असल्याचे चित्र आहे.

देठ सुकी नेमकी काय?

सध्या बागांमध्ये दिसत असलेला प्रकार नेहमीच्या देठ सडपेक्षा वेगळा असून देठ सुकी आहे. या समस्येत फळाचा देठ हळूहळू वाळत जातो. परिणामी फळाची झाडाशी असलेली पकड सैल होते आणि अखेरीस फळ खाली गळून पडते. फळे तयार होण्याच्या किंवा काढणीच्या जवळच्या काळात मोठ्या प्रमाणात फळगळ झाल्यास शेतकऱ्यांना थेट उत्पादनाचे नुकसान सहन करावे लागू शकते. सध्या नरखेड तालुक्यातील अनेक बागांमध्ये झाडाखाली मोठ्या प्रमाणावर गळलेली संत्री आणि मोसंबी दिसत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.नुकसानीने शेतकरी हतबल : फळबाग उभी करणे आणि तिचे वर्षभर व्यवस्थापन करणे यासाठी शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागतो. खते, औषधांची फवारणी, सिंचन, मशागत, मजुरी आणि इतर व्यवस्थापनावर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. ऐन उत्पादनाच्या काळात फळे गळून पडल्यास वर्षभर केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाचा हंगाम हातातून जाण्याची भीती संत्रा-मोसंबी उत्पादकांमध्ये निर्माण झाली आहे.उपाययोजनांबाबत मार्गदर्शनाची गरज : एका बाजूला पावसाची तूट आणि दुसऱ्या बाजूला वाढते तापमान यामुळे फळबागांवरील पाण्याचा ताण वाढला आहे. त्यातच देठ सुकीमुळे फळगळ सुरू झाल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट निर्माण झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. त्यामुळे या बागांचे नुकसान केवळ एका हंगामापुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम करू शकते. यासाठी उपाययोजनांबाबत तात्काळ मार्गदर्शनाची गरज निर्माण झाली आहे.

तातडीने उपाययोजना करण्याची अपेक्षा : बाधित संत्रा-मोसंबी बागांची कृषी विभागाने पाहणी करावी. देठ सुकीचे नेमके कारण निश्चित करण्यासाठी तज्ज्ञांकडून तपासणी करावी. पाण्याच्या ताणाच्या परिस्थितीत सिंचन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करावे. फळगळ रोखण्यासाठी शास्त्रीय उपाययोजनांची माहिती देण्याची गरज. नुकसानग्रस्त बागायतदारांना आवश्यकतेनुसार शासनाच्या मदतीबाबत मार्गदर्शन करावे लागणार आहे. ऐन उत्पादनाच्या काळात संत्रा-मोसंबीची फळे मोठ्या प्रमाणावर गळून पडत असल्याने बागायतदारांची चिंता वाढली आहे. आता कृषी विभाग या परिस्थितीची किती गांभीर्याने दखल घेतो आणि शेतकऱ्यांना कोणते शास्त्रीय मार्गदर्शन मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# द्राक्ष बाग लावण्याआधी या गोष्टींची घ्या काळजी

सध्या तरुणाईचा ओढा पाहिला तर बऱ्यापैकी आता शेतीकडे वळताना दिसत आहे. परंतु परंपरागत पद्धत आणि पिके आहेत, त्यांना तिलांजली देऊन आधुनिक पद्धतीने शेती करून नवनवीन पिके घेण्याकडे त्यांचा कल आहे. जास्तकरून तरुणाई फळबाग लागवडीकडे मोठ्या प्रमाणावर वळत आहे. द्राक्ष बागाचा विचार केला तर याच्या लागवडीसाठी काही महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते

या गोष्टींचा अभ्यास महत्त्वाचा :द्राक्षबागांचे लागवड केली तर पहिले पीक साधारणतः दीड वर्षात हातात येते. एकदा द्राक्षाची लागवड केली तर कमीत कमी दहा वर्षापर्यंत एक चांगला आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत मिळणे शक्य आहे. द्राक्ष बागेत वर्षभर वेगवेगळ्या पद्धतीचे कामे असतात त्यामुळे मजुरांच्या हाताला देखील वर्षभर काम उपलब्ध होते. आपल्या जवळ उपलब्ध असलेले पाणी, जमीन आणि मनुष्यबळ यांचा चांगल्या पद्धतीने मेळ घालता येतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे द्राक्षबाग हे एक प्रतिष्ठितपणाचे तसेच अभ्यासूपणाचे द्योतक आहे.

किती क्षेत्रात करावी लागवड : हा मुद्दा सगळ्यात महत्त्वाचा असून यामध्ये द्राक्ष बाग लागवड करण्याआधी आपली एकूण जमीन किती आहे? ती बागायत आहे का? इत्यादी गोष्टींचा विचार करणे खूप गरजेचे आहे. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे द्राक्ष बागेची लागवड करताना ३४/३७/४२/४६ गुंठे असे अडनिड क्षेत्र निवडू



नका.

द्राक्ष बाग नेमकी कोणत्या ठिकाणी लावावी :समजा बऱ्याचदा जमिन एका ठिकाणी नसते तर ते दोन ते तीन ठिकाणी असते तर अशावेळी एकाच कुठल्यातरी ठिकाणांची निवड करणे अपेक्षित असते. जमिनीची निवड करताना त्या जमिनीचे क्षेत्र, या जमिनीचा सुपीकता व त्या जमिनीला असलेल्या पाणीपुरवठा साधनांची सोय व वाहतुकीसाठी रस्ता इत्यादी बाबींचा विचार करणे खूप गरजेचे आहे.

द्राक्ष बाग लावण्याची वेळ :द्राक्ष बागेची लागवड कधीही करू शकतात. परंतु काही अपवाद वगळता मध्य ऑक्टोबर ते जानेवारीच्या मध्यात लागवड करू शकता. जर डिसेंबर, जानेवारीत लागवड केली तर अधिक यशस्वी होते व पहिले पीक १५ महिन्याच्या आत हातात देऊ शकते.

द्राक्ष जातींची योग्य निवड :काही प्रचलित आहेत त्यामधून निवड करणे उत्तम असते. नवीन द्राक्ष बाग लागवड करताना नवीन, पहिल्यांदा माहीत नसलेली द्राक्ष जात लावू नये. प्रचलित जातींपैकी थॉमसन सीडलेस, सोनाका, माणिक चमन, शरद सीडलेस इत्यादी जातींची निवड महत्त्वाची ठरते.

लागवड किती अंतरावर करावी :द्राक्षांची लागवड करताना दोन ओळीत आठ फूट व दोन वेलीत सहा फूट अंतर असणे गरजेचे आहे. रूट स्टॉक वापरायचा असेल तर दोन ओळींत बारा फूट आणि दोन वेलीत ८ फूट अंतर ठेवावे.

लागवड चर पद्धतीन केल्यास ठरते फायदेशीर :द्राक्ष लागवडीसाठी खड्डे यापेक्षा चरांची निवड करणे फायद्याचे असते. चर पद्धती सर्व प्रकारच्या जमिनीसाठी उपयुक्त आहे. चराचे माप घेताना तुमच्या जमिनीचा प्रकार कसा आहे यावर ते सगळे अवलंबून असते. याची रुंदी दोन फूट व खोली अडीच फूट किंवा रुंदी अडीच फूट व खोली दोन फूट ठेवावी. जमिनीच्या उतारानुसार चराची लांबी ठरवणे गरजेचे असते. साधारणतः ती शंभर फुटांपेक्षा जास्त असू नये.

चरात कोणती खते द्यावीत : यासाठी तुमच्या जमिनीचा पोत व तुमच्या जमिनीचा माती परीक्षण अहवाल यांचा विचार करावा. परंतु तरीही खतांचा विचार केला तर चांगले कुजलेले कंपोस्ट खत बारा टन, जिवाणू युक्त सेंद्रिय खते पाचशे ते एक हजार किलो, कडू पेंड पाचशे ते एक हजार किलो व त्यासोबतच हिरवळीचे खत एका एकरातील एका एकरासाठी वापरावे.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

७९ : ७९ई.पुर्व : इटलीतील माउंट व्हेसुव्हियस ज्वालामुखीचा उद्रेक. पॉम्पेई, हर्क्युलेनियम स्टेबी ही शहरे राखेखाली दडपली जाऊन नष्ट.
१४५६ : जर्मनीतील मेन्झ येथे जोहान्स गुटेनबर्ग यांनी बायबल ग्रंथाच्या छपाई काम पूर्ण केलं.
१६०८ : ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचा पहिला प्रतिनिधी सुरत येथे दाखल झाला.
१६९० : कोलकाता शहराची स्थापना.
१६९९ : ईस्ट इंडिया कंपनीने विकत घेतलेल्या कोलकाता शहराला प्रेसिडेंसी शहर म्हणून विकसित करण्यास सुरुवात केली तेव्हा त्यांनी त्या शहराचे नाव बदलून कलकत्ता असे ठेवले.
१८७५ : कॅप्टन मॅथ्यू व्हेब इंग्लिश खाडी पोहणारे पहिला व्यक्ती ठरले.
१८९१ : थॉमस अल्वा एडिसनने चलचित्र कॅमेऱ्याचे पेटंट घेतले.
१९५० : एडिथ सॅम्पसन हा संयुक्त राष्ट्रात जाणारा पहिला कृष्णवर्णीय अमेरिकन प्रतिनिधी ठरला.
१९३६ : ऑस्ट्रेलियन अंटार्क्टिक प्रदेश तयार करण्यात आला.
१९६६ : रशियन बनावटीचे लूना-११ हे मानवविरहित यान चांद्रमोहिमेवर निघाले
१९६९ : भारतीय राजकारणी नेते वी. वी. गिरी यांची भारताच्या राष्ट्रपती पदी निवड करण्यात आली. ते भारताचे चौथे राष्ट्रपती होते.
१९७४ : साली श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात काँग्रेस नेता फखरुद्दीन अली अहमद यांची भारताच्या पाचव्या राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली.
१९९१ : युक्रेनने स्वत:ला (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र घोषित केले.
१९९५ : मायक्रोसॉफ्टने विंडोज ९५ ही संगणकप्रणाली प्रकाशित केली.
१९९८ : एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका या जगप्रसिद्ध विश्वकोशाच्या आयातीवर भारत सरकारने बंदी घातली.
२००१ : सरोद वादक अमजद अली खान यांना मध्य प्रदेश सरकारचातानसेन पुरस्कार जाहीर.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३३ : गुजराथी लेखक समाजसुधारक नर्मदाशंकर दवे ऊर्फ नर्मद यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८८६)
१८७२ : केसरी वृत्तपत्राचे संपादक तसेच कायदेमंडळाचे सभासद न. चिं. केळकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑक्टोबर १९४७)
१८८० : निरक्षर पण प्रतिभावान कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: ३ डिसेंबर १९५१)
१८८८ : स्वतंत्र भारतातील मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेर यांचा जन्म. (मृत्यू: ८ मार्च १९५७)
१८८८ : मार्टिन बेकर एरिक कंपनी चे सहसंस्थापक वेलेंटाइन बेकर यांचा जन्म. (मृत्यू: १२ सप्टेंबर १९४२)
१९०८ : क्रांतिकारक शिवराम हरी राजगुरू यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९१७ : किराणा घराण्याचे गायक पं. बसवराज राजगुरू यांचा जन्म.
१९१८ : केन्द्रीय परराष्ट्रमंत्री सिकंदर बख्त यांचा जन्म. (मृत्यू: २३ फेब्रुवारी २००४)
१९२० : पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील किराणा घराण्याचे प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. बसवराज राजगुरू यांचा जन्मदिन.
१९२७ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ हॅरी मार्कोवित्झ यांचा जन्म.
१९२७ : भारतीय अभिनेत्री आणि निर्मात्या अंजली देवी यांचा जन्म.
१९२९ : यासर अराफत नोबेल पारितोषिक विजेते पॅलेस्टाईनचे नेते (मृत्यू: ११ नोव्हेंबर २००४)
१९३२ : रावसाहेब गणपराव जाधव मराठीतील व्यासंगी साहित्यसमीक्षक. 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळा'चे तिसरे अध्यक्ष व 'मराठी विश्वकोशा'चे प्रमुख संपादक (२००१ २००३).
१९४४ : संयुक्ता पाणिग्रही ओडीसी नर्तिका (मृत्यू: २४ जून १९९७)
१९४५ : डब्ल्यू.डब्ल्यू.ई.चे सहसंस्थापक विन्स मॅकमेहन यांचा जन्म.
१९४७ : पॉलो कोहेलो ब्राझिलियन लेखक

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२५ : सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर संस्कृत पण्डित, प्राच्यविद्या संशोधक, भाषाशास्त्रज्ञ, इतिहास संशोधक व समाजसुधारक (जन्म: ६ जुलै १८३७)
१९६७ : कैसर शिपयार्ड आणि कैसर एल्युमिनियम चे संस्थापक हेन्री जे. कैसर यांचे निधन. (जन्म: ९ मे १८८२)
१९६८ : आधुनिक भारताचे अग्रगण्य विचारवंत आणि सामाजिक वैज्ञानिक, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्रचे प्राध्यापक तसचं, लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू राधाकमल मुखर्जी यांचे निधन.
१९९३ : शतायुषी क्रिकेटमहर्षी प्रा. दिनकर बळवंत तथा दि. ब. देवधर प्रथमश्रेणीचे ६२ सामने, १०० डाव, ११ वेळा नाबाद, ९ शतके, ३९५१ एकूण धावा, ४४.३९ सरासरी. भारत सरकारतर्फे त्यांना पद्मश्री (१९६५) व पद्मविभूषण (१९९१) या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. (जन्म: १४ जानेवारी १८९२)
२००० : कल्याणजी वीरजी शाह सुमारे तीन दशके रसिकांवर आपल्या सुरावटीची मोहिनी घालणार्या 'कल्याणजी-आनंदजी' या संगीतकार द्वयीतील ज्येष्ठ बंधू (जन्म: ३० जून १९२८)
२००८ : चिनी भाषेमधील कवी, लेखक, पत्रकार वै वै यांचे निधन.
२०१८ : जॉन मैककेन, जॉन सिडनी मॅककेन तिसरा हा एक अमेरिकन राजकारणी व ॲरिझोना राज्यातून वरिष्ठ सेनेटर.(जन्मतारीख: २९ ऑगस्ट, १९३६)
२०१९ : भारताचे केंद्रीय अर्थमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अरुण जेटली यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९५२)

# पीक विमा परताव्यासाठी केंद्र सरकार सकारात्मक

## अॅड ऑन कवच, राज्य सरकारच्या भूमिकेवर शिवराजसिंह चौहान यांचे खा.बजरंग सोनवणे यांना पत्र

बीड। प्रतिनिधी

खा.बजरंग सोनवणे यांनी पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत प्रलंबित विमा दाव्यांचे त्वरित प्रदान करणे, खंडित (अॅड ऑन) कवच पुन्हा लागू करणे, अतिवृष्टी व पुरामुळे कायमस्वरूपी नुकसान झालेल्या शेतजमिनीसाठी विशेष मदत देणे आणि योजनेत आवश्यक सुधारणा करण्याबाबत केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांना २८ जुलै २०२६ रोजी पत्र पाठवून लक्ष वेधले होते. या पत्राची गंभीर दखल घेत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी खा.बजरंग सोनवणे यांना सविस्तर उत्तर दिले असून, देशातील आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकार पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले आहे.



खा.सोनवणे यांच्या पत्राला उत्तर देताना केंद्रीय कृषी मंत्र्यांनी म्हटले आहे, पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या विमा दाव्यांचे प्रदान हे राज्य सरकारने मंजूर केलेल्या आणि अंतिम केलेल्या दाव्यांच्या आकडेवारीनुसार आणि योजनेतील तरतुदींनुसार संबंधित विमा कंपन्यांकडून केले जाते. विमा दाव्यांचे वेळेत आणि पारदर्शकपणे निवारण करण्यासाठी कृषी मंत्रालय राज्य सरकारे आणि विमा कंपन्यांशी नियमितपणे समन्वय साधत असते. पीक विमा योजनेतील अतिरिक्त किंवा अॅड-ऑन कवचाबाबत स्पष्टीकरण देताना केंद्रीय मंत्र्यांनी स्पष्ट केले की, 'पीएमएफबीवाय' च्या २०२३ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे पिकांचे नुकसान हे अनिवार्य भागाचा भाग आहे. पेरणी न होणे/अयशस्वी होणे, प्रतिकूल हवामान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि काढणीनंतरचे नुकसान हे 'अॅड ऑन' कवरेजमध्ये मोडतात. हे अतिरिक्त धोके योजनेत समाविष्ट करायचे की नाही, याचा संपूर्ण अधिकार राज्य शासनाचा असतो.

### बीड जिल्ह्यातीलस्थिती

एकूण अर्ज: ९८,७३,८०३

देय रक्कम: १,७९७.०३ कोटी

वाटप रक्कम: १,७९५.७० कोटी

लाभान्वित शेतकरी अर्ज: ३९,७९,८२२

प्रलंबित दावे: अवघे १.३३ कोटी

### मुख्यमंत्र्यांना गतवर्षीच दिले पत्र

राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या सल्ल्याने राज्य सरकार प्रत्येक हंगामासाठी यावर निर्णय घेते. महाराष्ट्र सरकारने खरीप २०२५ च्या हंगामात सर्व अतिरिक्त (अॅड-ऑन) कवरेज हटवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, हे अॅड-ऑन कवरेज पुन्हा समाविष्ट करण्यात यावे, यासाठी केंद्रीय कृषी मंत्यांनी स्वत: ६ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून विनंती केली असल्याचेही या उत्तरात उघड झाले आहे.

### बीडमधील प्रलंबिततेची कारणे

बीड जिल्ह्यातील बहुतांश वर्षांतील दावे यशस्वीरीत्या वितरित झाले असून, उरलेले १.३३ कोटींचे दावे हे प्रामुख्याने बँक खात्यांचे तपशील चुकीचे असणे आणि १००० पेक्षा कमी दाव्यांच्या प्रकरणात राज्यांश (राज्य सररकारचा निधी) वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे रखडले आहेत.

### खा.सोनवणेंनी आणली वस्तूस्थिती समोर


केंद्रीय कृषी मंत्रालय देशातील सर्व शेतकरी बांधवांच्या सेवेसाठी आणि त्यांच्या आर्थिक कल्याणासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. पीक विमा योजनेची अधिक पारदर्शक, सुलभ आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जात आहेत. खा.बजरंग सोनवणे यांच्या या पाठपुराव्यामुळे बीडसह राज्यातील शेतकऱ्यांच्या पीक विमा दाव्यांमधील अडचणी, अॅड ऑन कवरेजची वस्तुस्थिती आणि प्रलंबित निधीची कारणे स्पष्ट झाली आहेत.

### जमीन नुकसानीबाबत मदतीची तरतूद

अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतजमिनीचे कायमस्वरूपी नुकसान झालेल्या जमिनींबाबत पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे की, पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत अशा प्रकारे जमिनीच्या कायमस्वरूपी नुकसानीसाठी स्वतंत्र नुकसानभरपाई किंवा विम्याची तरतूद नाही. अशा प्रकरणांमध्ये राज्य सरकारद्वारे राज्य आपत्ती प्रतिसाद निधी, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी किंवा इतर प्रचलित मदत नियमांनुसार शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते.

# पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याला मिळाला ५२०० उच्चांक भाव

## ७६१ क्विंटल कांद्याची आवक सरासरी ३३०० भाव शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद



पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य मार्केट यार्डमध्ये कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होत असून, कांद्याला प्रतिक्विंटल कमाल ५ हजार २०० रुपये तर किमान १ हजार रुपये भाव मिळाला कांद्याचा सरासरी बाजारभाव ३ हजार ३०० रुपये प्रतिक्विंटल राहिला चांगला भाव मिळण्याबरोबरच शेतमाल विक्रीनंतर त्वरित पट्टी मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा पाथर्डी बाजार समितीकडे कल वाढत आहे बुधवार १९ ऑगस्ट रोजी पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीत एकूण ७६१ क्विंटल कांद्याची आवक झाली बाजार समितीच्या कांदा मार्केटमध्ये प्रतवारीनुसार कांद्याला वेगवेगळे दर मिळाले चांगल्या प्रतीच्या कांद्याला ४ हजार ते ५ हजार २०० रुपये दुसऱ्या प्रतवारीच्या कांद्याला २ हजार ८०० ते ४ हजार रुपये तिसऱ्या प्रतवारीच्या कांद्याला १ हजार ८०० ते २ हजार ८०० रुपये तर चौथ्या प्रतवारीच्या कांद्याला १ हजार ते १ हजार ८०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला

बुधवारी झालेल्या कांद्याच्या निलावामध्ये कांद्याच्या प्रतवारीनुसार प्रथम प्रतवारीच्या कांद्याला ४ हजार ते ५ हजार २०० रुपये द्वितीय प्रतवारीला २ हजार ८०० ते ४ हजार रुपये तृतीय प्रतवारीला १ हजार ८०० ते २ हजार ८०० रुपये तर चतुर्थ प्रतवारीच्या कांद्याला १ हजार ते १ हजार ८०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला बाजारात कांद्याचा किमान भाव १ हजार रुपये कमाल भाव ५ हजार २०० रुपये तर सरासरी भाव ३ हजार ३०० रुपये प्रतिक्विंटल राहिला बाजार समितीत एकूण ७६१ क्विंटल कांद्याची आवक झाली.

बाजार समितीमध्ये कांद्याचा लिलाव बुधवार आणि रविवार या दोन दिवशी होत आहे त्यामुळे तालुक्यातील तसेच परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कांदा मोठ्या प्रमाणात पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीसाठी आणावा असे आवाहन बाजार समितीचे अध्यक्ष सुभाष बर्डे उपाध्यक्ष कुंडलिक आव्हाड व संचालक मंडळाने केले आहे याबाबत अध्यक्ष सुभाष बर्डे म्हणाले पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांना प्राधान्य देऊन काम करीत आहे गेल्या दोन वर्षांत बाजार समितीने चांगली प्रगती केली असून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत पाथर्डी बाजार समितीमध्ये पूर्वी कांदा मार्केट नव्हते मागील वर्षापासून कांदा मार्केट सुरू करण्यात आले असून त्याला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे सध्या पाथर्डी बाजार समितीत दिवसेंदिवस कांद्याची आवक वाढत आहे चांगला बाजारभाव आणि शेतमालाची विक्री झाल्यानंतर त्वरित पट्टी मिळत असल्याने शेतकरी समाधानी आहेत त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात कांदा पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीत आणून विक्री करावी असे आवाहन अध्यक्ष सुभाष बर्डे यांनी केले.

# जेपीसी बँक आर्थिकदृष्ट्या अत्यंत सक्षम व भक्कम स्थितीत-सतीश पंच

## खेळीमेळीच्या वातावरण वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न;सभासदांना लाभांश वाटपाचा निर्णय

जालना। प्रतिनिधी

दि जालना पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेने आपल्या उत्कृष्ट व विश्वासार्ह कामकाजाच्या जोरावर १०९ वर्षे पूर्ण केली असून, बँक आर्थिकदृष्ट्या अत्यंत सक्षम व भक्कम स्थितीत आहे. बँकेची आर्थिक स्थिती आणखी मजबूत करण्यासाठी संचालक मंडळ ठेवी व कर्जात वृद्धी तसेच थकीत कर्जाच्या वसुलीवर विशेष भर देत आहे, असे प्रतिपादन बँकेचे चेअरमन सतीश सितारामजी पंच यांनी केले.

जालना पीपल्स बँकेची ६८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळील श्री गुरुगणेश सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी चेअरमन सतीश पंच हे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बोलत होते.व्यासपीठावर बँकेचे व्हाईस चेअरमन किशोर देविदान, संचालक संजय भारतीया, सौ. सुनंदा नंदकिशोर अग्रवाल, सुनील चौधरी, अॅड. अनिल संचेती, राजकुमार




दायमा, हितेंद्र शाह, अभय करवा, जयेश बाविशी, अनुराग अग्रवाल, सुनील बियाणी, सौ. वर्षा भक्कड, सुभाष वाघमारे, दीपक भुरेवाल, तज्ज्ञ संचालक सीए निखिल कैलासचंद बाहेती व बँकेचे महाव्यवस्थापक विजय जोशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना चेअरमन सतीश पंच पुढे म्हणाले की, दि. ३१ मार्चअखेर बँकेची एकूण आर्थिक स्थिती समाधानकारक राहिली असून बँकेने सातत्याने प्रगतीचा आलेख उंचावला आहे. चालू आर्थिक वर्षात बँकेने सभासदांना लाभांश वाटप करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. तसेच बँकेतील ५ लाख रुपयांपर्यंतच्या ठेवींना डीआयसीजीसीकडून नियमित विमा संरक्षण प्राप्त आहे. बँकेने ग्राहकांच्या सुविधेसाठी मोबाईल बँकिंग सेवा कार्यान्वित केली असून, अनेक खातेदार याचा लाभ घेत आहेत. उर्वरित बचत खातेधारक व नजरगहाण कर्जदारांनीही मोबाईल बँकिंग सुविधेचा लाभ घेण्यासाठी नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. सोबतच थकीत कर्जदारांनी आपले कर्जखाते तातडीने बेबाक करून बँकेच्या विकासात सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.दि. ३१ मार्च २०२६ अखेर एकूण ठेवी ७३ कोटी ३४ लाख,एकूण कर्जवाटप ३६ कोटी ४९ लाख रुपये असून, निव्वळ नफा : रु. १६ लाख ४९ हजार एवढा झाला आहे. नेट एनपीए शून्य टक्के, ग्रॉस एनपीए ६.९१ टक्के, सीआरएआर २३.४० टक्के, नेटवर्थ ११ कोटी ४९ लाख रुपये असून, ऑडिट वर्ग 'अ' वर्ग आहे, असे ते म्हणाले.

### वेळेत निदान अन् नियमित तपासणीनेच कॅन्सरवर मात:डॉ. शिंदे

अहिल्यानगर। प्रतिनिधी

कॅन्सर हा शब्द ऐकल्यानंतर रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मनात भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे; मात्र भीतीपोटी तपासणी टाळणे योग्य नाही. कॅन्सरचे लवकर निदान झाल्यास उपचारांचे परिणाम अधिक चांगले मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे शरीरात कोणताही असामान्य बदल जाणवल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. नियमित तपासणी, संतुलित आहार, व्यसनांपासून दूर राहणे, आरोग्याबाबत जागरूकता या गोष्टी कॅन्सरविरोधातील लढ्यात महत्त्वाच्या आहेत. आरोग्याची समस्या लहान आहे असे गृहीत धरून त्याकडे दुर्लक्ष करू नये. वेळेत तपासणी करून योग्य निदान करून घेणे हा उपचारातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे असे प्रतिपादन डॉ. अनिकेत शिंदे यांनी केले. श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिरांच्या उपक्रमांतर्गत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ११० रुग्णांनी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घेत वैद्यकीय मार्गदर्शनाचा लाभ घेतला. या शिबिराचे उद्घाटन आयोजक स्व. मानकचंदजी संकलेचा व स्व. कमलाबाई संकलेचा यांच्या स्मरणार्थ विजय संकलेचा, साधना संकलेचा, सिद्धार्थ संकलेचा, कियाना संकलेचा, हितार्थ संकलेचा, राजेंद्र संकलेचा, संजय संकलेचा तसेच संकलेचा परिवाराच्या हस्ते करण्यात आले.

# नागसेन बुद्ध विहाराच्या विकासासाठी ३५ लाखाचा निधी

## पप्पू कागदे यांचे मोलाचे योगदान

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील पालवण चौक धानोरा रोड येथील नागसेन बुद्ध विहाराच्या शोभीकरणासाठी विविध विकासाची कामे करण्यासाठी रविवार (दि.२३) ऑगस्ट रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते ३५ लक्ष रुपयांच्या विकास कामाचा उदघाटन सोहळा संपन्न करण्यात आला.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी व धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी नागसेन बुद्ध विहारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या माध्यमातून शिल्लक राहिलेल्या रक्कमेतून बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. नागसेन बुद्ध विहारात



भव्य कमान, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व विहाराच्या विविध विकास कामासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मोलाचे योगदान देऊन ३५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, शितलकुमार सुकाळे, अड. भगवान कांडेकर, नगरसेवक प्रमोद शिंदे, रणजीत बनसोडे, भास्कर सरपते, अच्युत उजगरे, विठ्ठलराव गाडे, अड कल्याणराव गाडे, सुंदरराव तांगडे, रोहिदास वाघमारे, अभिमन्यू सोनवणे, उमाजी आठवले, श्रीमंत उजगरे, मारुती सुरवसे, सुनील कांबळे, मनोज वाघमारे, बबनराव पंडित, सुमित जोगदंड, डीजे कांबळे, अश्रुबा शिंदे, बाळू डोळस, ईश्वर धन्वे, विनोद औसरमल, मधुकर गायकवाड, आर.एम वाघमारे, गौतम कांबळे, संजय हनुमते, प्रा. संजय घाडगे, केशरताई कांबळे, रेखाताई सोनवणे, छाया धन्वे, शाम वीर, शिंदे ताई, दयानंद उजगरे, धम्मा पारवेकर, सोनवणे फौजी, भास्कर जावळे यांच्यासह शेकडो उपासक-उपासिका उपस्थित होते.नागसेन बुद्ध विहारातील उदघाटन सोहळा यशस्वी करण्यासाठी मनोज नाना मस्के यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.अमरेंद्र विद्याघर यांनी केले तर सूत्रसंचालन महादेव इनकर यांनी केले.

# मुळा धरणातून वांबोरी चारी पाटचाऱ्या भगवानगड व ३५ गावात पुनर्निर्मित करा!

## मुख्यमंत्री महोदय संत भगवानबाबांच्या भूमीत शेती सिंचन पाण्यासाठी वॉटर ग्रीन फिल्ड प्रकल्प पूर्ण करा

प्रा.दादासाहेब खेडकर

पाथर्डी : पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील भगवानगड परिसर हा अनेक दशकांपासून दुष्काळी पट्टा असल्याने व तेथील ऊसतोड मजूर शेतकरी कामगार कष्टकरी शेतकरी व्यापारी हे स्थलांतरित मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात शेतीसाठी व पिण्यासाठी दुष्काळसदृश्य परिस्थितीत पाणी नसल्याने शेती व शेतीपूरक व्यवसाय ठप्प पडल्याने भगवानगड आणि परिसरातील ३५ गावांमध्ये पिण्याचे पाणी शेतीसाठी पाणी नसल्याने अनेक पिढ्यांपासून संसार उध्वस्त झाले आहेत शेतकऱ्यांनी आत्महत्या देखील केले आहेत ऊसतोड मजुरांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळत नसल्याने येथील ऊसतोड मजूर कष्टकरी शेतकरी हा ब्रिटिश राजवटी सारखा कायम गुलाम असल्याच्या भावना त्यांच्या मनामध्ये आजही घर करून आहेत पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील टाकळीमानुर आणि भालगाव जिल्हा परिषद गटातील जवळपास ३५ गावांमध्ये आजही पिढ्यानपिढ्या येथील शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी व शेती सिंचनाच्या पाण्यासाठी झुंजावे लागत असल्याने गेल्या सात दशकात अनेक पिढ्यांपासून राजकारण समाजकारण अर्थकारण चालू आहे.

परंतु तिथल्या शेतकऱ्यांच्या ऊसतोड मजूर कामगारांच्या समस्या जैसे थे आहेत महाविकास आघाडी सरकार असताना २०१९ यावर्षी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा मंजूर केली २०३ कोटी रुपये या प्रकल्पासाठी निधी मंजूर झाला परंतु गेल्या सात वर्षापासून भगवानगड व ४६ गावच्या पाणीपुरवठा योजनेचा बट्ट्याबोळ झालेला दिसून येत आहे काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टाक्या झाल्या पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील ४६ गावांमध्ये पाईपलाईनचे काम झाले परंतु प्रत्यक्षात जायकवाडी जलाशयातून भगवानगड ४६ गाव पाणीपुरवठा योजना प्रत्यक्षात मूर्त स्वरूप प्राप्त करू शकले नाही याचे तांत्रिक कारण काय आहे याचे उत्तर संक्षिप्त आहे परंतु ही योजना प्रत्यक्षात अमलात न आल्याने आजही भगवानगड ४६ गाव परिसरातील माता माऊली शेतकरी ऊसतोड मजूर पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करताना दिसत आहेत दुसरीकडे राहुरी तालुक्यातील सह्याद्रीच्या कळसुबाई शिखर पर्वताच्या कुशीत १९५८ ते १९७२ यादरम्यान मुळा धरणाची निर्मिती केली गेली मुळा धरणात सरासरी वार्षिक पाऊस ५०८० किमी होतो तसेच मुळा धरणाची पाणलोट साठवणूक क्षमता असे ९४१.८८ दशलक्ष घनमीटर आहे मुळा धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्या माध्यमातून राहुरी नेवासा शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सोडले जाते परंतु पाथर्डी तालुक्यातील कासार पिपळगाव अमरापूर कोरडगाव इथपर्यंत वांबोरी चारीच्या पाटचाऱ्या आहेत परंतु तिथून पुढे पूर्व भागातील भगवानगड परिसर आणि त्याला जोडलेली ३५ गावे ही आजही वांबोरी चारीच्या पाटपाण्याचे वाट पाहत आहेत यामुळे नाशिक जिल्ह्यात अतिवृष्टी पाऊस झाल्यास नाशिकच्या गोदावरी नदीतून पाण्याचा विसर्ग पैठण येथील नाथसागर जायकवाडी जलाशयात होतो आणि नाथसागर जलाशय १००% भरल्यास २७ दरवाजे उघडून अतिरिक्त पाणी मराठवाड्यातील बीड नांदेड जालना छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी पाणी मिळते असेच गोदावरी नदीचे अतिरिक्त विसर्गाचे पाणी व मुळा धरण ओव्हर फ्लो झाल्यावर मुळा धरणातील अतिरिक्त पाणी नेवासा तालुक्यातील प्रवरा नदीला येऊन मिळते तिला प्रवारासंगम असे म्हणतात हेच अतिरिक्त पाणी पाथर्डी तालुक्यातील मिरी करंजी तिसगाव कासार पिंपळगाव हनुमान टाकळी अमरापुर पर्यंत वांबोरी चारीच्या माध्यमातून मिळते हेच मुळा धरणाचे पाणी पूर्व भागातील भगवानगड परिसर व ३५ गावांना उपलब्ध होऊ शकते फक्त त्यासाठी वांबोरी चारी पाटचाऱ्या पुनर्निर्माण करण्याची आवश्यकता आहे यासाठी आमदार मोनिका राजळे यांच्या माध्यमातून पालकमंत्री व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रकल्प तातडीने राबवून भगवानगड परिसरातील भटक्या ऊसतोड मजूर कामगार शेतकरी कष्टकरी श्रमिक व्यापारी यांच्या सिंचनाच्या शेतीसाठी व पिण्याच्या पाण्याची वैश्विक व्यवस्था करण्याची गरज आहे परंतु वांबोरी चारीचे अपूर्ण व अर्धवट राहिलेले पाटचाऱ्यांचे पुनर्निर्मनाचे काम कोणत्या महात्म्याच्या माध्यमातून होईल यचे उत्तर येणारा काळच देईल.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

सोमवार दि.२४ ऑगस्ट २०२६ | ६

# जिल्हा रुग्णालयातील सावळागोंधळ

## उपचार कमी दिखावा जास्त, रुग्णांना 'रेफर' करण्याची संख्या वाढली

बीड । प्रतिनिधी

**जिल्हा रुग्णालयातील स्त्रीरोग व प्रसूती विभागात कर्तव्यात निष्काळजीपणा करणे, रुग्णांना विनाकारण इतरत्र संदर्भित (रेफर) करणे आणि वरिष्ठांच्या आदेशांची पायमल्ली करणे या कारणावरून दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. डॉ. नितीन संतराम राठोड आणि डॉ. स्नेहल मनोज मेंगडे या दोन स्त्रीरोगतज्ज्ञांना २९ ऑगस्ट रोजी तडकाफडकी कार्यमुक्त करण्यात आले असून, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांनी यासंदर्भातील अहवाल आरोग्य सेवा आयुक्तांकडे पाठवला आहे.**

कारवाईची प्रमुख कारणे

रुग्णांना विनाकारण रेफर करणे : जुलै महिन्यात या विभागातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण रेफर करण्यात आले. यामध्ये डॉ. नितीन राठोड यांनी २६, डॉ. पूनम लोध यांनी १८, तर डॉ. स्नेहल मेंगडे यांनी १६ रुग्णांना रेफर केल्याचे समोर आले आहे.



विनापरवानगी गैरहजेरी : डॉ. स्नेहल मेंगडे या वरिष्ठांची परवानगी न घेता २१ ते ३० ऑगस्ट दरम्यान रजेचा अर्ज टाकून निघून गेल्या, तर डॉ. नितीन राठोड हे १३ ऑगस्ट रोजी पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहिले.

वेतन व भत्ते रोखले : या दोघांविरोधात शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून, २९ ऑगस्टपासून त्यांचे वेतन व भत्ते न काढण्याचे निर्देश लेखा विभागाला देण्यात आले आहेत. पुढील आदेशासाठी त्यांना आयुक्तांकडे हजर राहण्याचे निर्देश आहेत.

गाजलेल्या 'मुस्कान शेख माता मृत्यू' प्रकरणात गंभीर ठपका असलेल्या आणि शस्त्रक्रिया करण्यास मनाई केलेल्या वर्ग-१ च्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. फरिदा शेख या सध्या या विभागाच्या प्रमुख आहेत. विभागात एवढा मोठा गैरकारभार सुरू असताना विभागप्रमुख म्हणून त्यांची जबाबदारी काय, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, ज्यांच्या अहवालावरून ही कारवाई झाली, त्या डॉ. फरिदा शेख यांच्यावर मात्र कोणतीही कारवाई झालेली नाही. अहवाल सादर करताना २२ रुग्ण रेफर करणाऱ्या एका डॉक्टरचे नाव वगळण्यात आल्याची माहिती समोर येत असून, बड्या अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी राजकीय हस्तक्षेप झाल्याची जोरदार चर्चा आता रंगू लागली आहे.

## राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत माजलगावचा जयसिंग तौर ठरला सुवर्णपदकाचा मानकरी

माजलगाव । प्रतिनिधी

विभागीय क्रीडा संकुल गारखेडा परिसर छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत अँड प्रमोद यांचा मुलगा जयसिंग तौर यास प्रथम रँक मधून प्रतिस्पर्ध्यावर मात करत सुवर्ण पदक पटकावले त्या बद्दल त्याचे प्रशिक्षक चंद्रमणी डोंगरे सर,माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके, जयसिंग भैय्या सोळंके, अँड भानुदासराव डक साहेब, अँड इंद्रजित शिंदे साहेब ,नितीन जाधव, क्षितीज गायकवाड, आदींनी अभिनंदन करुन माजलगाव सह बीड जिल्ह्याचे नाव राज्यस्तरीय स्पर्धेत लौकिक करुन सुवर्णपदक मिळवल्या बद्दल मनपूर्वक अभिनंदन केले व पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी व यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या, जयसिंग तौर याचे सामाजिक व राजकीय स्तरातून सर्वत्र कौतुक केले जात आहे.





## जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा आ. सुरेश धस यांच्या निवासस्थानी सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्हा वकील संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आष्टी येथील अद्वैतचंद्र निवासस्थानी आ. सुरेश धस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी आ. सुरेश धस यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित वकिलांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



बीड जिल्हा वकील संघाच्या अध्यक्षपदी ड. बी. एस. बोडखे, उपाध्यक्षपदी ड. गोपाल सर्वज्ञ, सचिवपदी ड. नितीन शिंदे तर ग्रंथपालपदी ड. वनदेव सूळ यांची निवड झाल्याबद्दल आ. सुरेश धस यांनी त्यांचे अभिनंदन केले. न्यायव्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा म्हणून वकील संघाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असून, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा वकील संघाची ◀◀ पान २ वर

## किसन बाबा यांची नवनाथ बाबा यांनी निरपेक्ष सेवा केली:- ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरू ह.भ.प.वै. किसन बाबा महाराज यांची ह.भ.प.गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांनी निरपेक्ष सेवा केले. आज श्री गोरक्षनाथ टेकडी येथील दिसणारे वैभव हे गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांनी आपले गुरू किसन बाबा यांची निरपेक्ष भावनेतून सेवा केल्यामुळे दिसत आहे. किसन बाबा यांची गुरुवर्य नवनाथ बाबा यांनी निरपेक्ष सेवा केली असे ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री यांनी अभंग विवेचना भावना व्यक्त केली.

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरू ह.भ.प.वै.किसन बाबा महाराज यांच्या २८व्या पुण्यस्मरणानिमित्त ह.भ.प. गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज



गोरक्षनाथ टेकडी येथे भाविक भक्तांची मांदियाळी

यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मध्ये द्वितीय कीर्तन रुपी सेवा ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री यांनी अर्पण केले. जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाचे विवेचन करताना शिवानंद महाराज शास्त्री पुढे असे म्हटले की श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आज जो अखंड हरिनाम सप्ताहामध्ये उत्साह दिसत आहे तो अध्यात्माचा उत्साह आहे व या उत्साहाच्या पाठीमागे सद्गुरू किसन बाबा महाराज यांची गुरुवर्य नवनाथ बाबा यांनी केलेली निरपेक्ष सेवा भाव होय.

परीस हा फक्त लोखंडाचे सोने करतो परंतु साधुसंत हे दगडाच सोनं करतात . नाथांची गादी ही सुखाची वाटते परंतु नाथांची गादी ही आगीची जागा आहे. साधुसंत हे चंदनाप्रमाणे असतात जसं चंदनाचे झाड तुटतानाही तोडणाऱ्याला सुगंधी देत .करत तसं साधुसंत हे त्रास देणाऱ्याचे सुद्धा जीवन सुखकार करतात असे शास्त्री महाराजांनी अभंग अभंग विवेचन केले ◀◀ पान २ वर

## राजनिल राजेश इंगोले राज्यात १२ वा ; प्रमोदजी महाजन स्कूलचे स्कॉलरशिप शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या तब्बल ४४ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले. इयत्ता चौथीचा विद्यार्थी राजनिल राजेश इंगोले यांनी राज्य गुणवत्ता यादीत १२ वा क्रमांक पटकावला आहे. यापूर्वीही राजनील राजेश इंगोले याने एमटीएस ऑलंपियाड, ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप



एक्झामिनेशन, महाराष्ट्र टॅलेंट सर्च, ज्युनिअर आयए.एस, मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा या स्पर्धा परीक्षांमध्ये दैदीप्यमान यश प्राप्त केले आहे.

इयत्ता पाचवीतून एकूण चौदा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून यामध्ये वेदांत मुळे राज्यात चौदावा तर धीरज लटपटे, कार्तिकी गवळी, स्वराली राजमाने, श्रुती इरलापल्ली, देवाशीष चौधरी, शांभवी शिंदे, सुरेश साकोरे, शौर्य चांदे, श्रीनिवास यादव, श्रेयस आघाव, तनिष्का मुंडे, सुदर्शन भोसलेकर, अनन्या तोळके यांनी यश मिळवले. तसेच, इयत्ता चौथीमधून राजनिल इंगोले राज्यात बारावा तर मथुरा लोमटे, विराज शिंदे, वेदिका कराड, गौरी कदम, अनुज बिरलारे, माऊली चाटे आणि सराज भोसले या आठ विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवत यश मिळवले आहे. इयत्ता सातवीमधून ◀◀ पान २ वर

## बेलुरा येथे तुती लागवडीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील बेलुरा येथे विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) व आत्मा अंतर्गत संघर्षयोध्दा शेतकरी बचत गट, क्रांतीसुर्य शेतकरी बचत गट व हरीत क्रांती शेतकरी बचत गट यांच्या वतीने तुती लागवड व रेशीम शेतीबाबत शेतकऱ्यांसाठी धोंडीराम सखाराम फपाळ यांच्या शेतात मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. रेशीम शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना



आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी तुती लागवडीचे महत्त्व, लागवड तंत्र आणि रेशीम किड्यांचे संगोपन याबाबत तज्ज्ञांनी माहिती दिली.

कार्यक्रमास रेशीम उपसंचालक, महाराष्ट्र राज्य महेंद्र ढवळे, जिल्हा रेशीम अधिकारी एस. बी. वराट, तहसीलदार संतोष रुईकर, वरिष्ठ शास्त्रज्ञ वीर शेट्टी, तांत्रिक सहाय्यक विकास मस्के, प्रगतशील शेतकरी शिवराज फाटे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी महेंद्र ढवळे यांनी बीड जिल्ह्यात रेशीम शेतीला मिळत असलेल्या वाढत्या प्रतिसादाचा उल्लेख करत शेतकऱ्यांनी तुती लागवडीकडे वळण्याचे आवाहन केले. रेशीम शेतीमुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त व नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध ◀◀ पान २ वर

## 'पदाधिकारी विकासासाठी की पैशांसाठी ?'

### माजी सभापती नवनाथ शिराळेंचा सत्ताधाऱ्यांवर घणाघाती आरोप

बीड । प्रतिनिधी

''पदाधिकारी जनतेच्या विकासासाठी काम करण्याऐवजी पैसे मिळविण्यासाठी भांडत असल्याचे चित्र दिसत आहे. शहरातील जनतेला आजही मुबलक पाणी मिळत नाही, आरोग्य आणि स्वच्छतेच्या मूलभूत सुविधा समाधानकारक नाहीत; मात्र पैसा कसा मिळवायचा, यासाठीच प्रयत्न सुरू असल्याचे दिसते,'' असा घणाघाती आरोप बीड नगरपरिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केला आहे.

बीड शहरातील नागरी सुविधांच्या प्रश्नांवरून त्यांनी



नगरपरिषद प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील नागरिकांना नियमित व मुबलक पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा, रस्ते आणि मूलभूत नागरी सुविधा मिळणे अपेक्षित असताना या प्रश्नांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला.

''लोकशाहीमध्ये पद हे जनतेची सेवा करण्यासाठी असते. जनतेच्या करातून मिळणाऱ्या पैशांचा योग्य वापर करून शहराचा विकास करणे ही पदाधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. मात्र विकासाच्या प्रश्नांपेक्षा आर्थिक हितसंबंधांना महत्त्व दिले जात असेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे,'' असे शिराळे पाटील यांनी म्हटले. शहरातील पाणीप्रश्न अद्याप कायम असून अनेक भागातील ◀◀ पान २ वर

## गेवराईजवळ अवैध वाळू वाहतुकीवर 'एलसीबी'चा छापा ३५ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त, दोघांवर गुन्हा

बीड / गेवराई । प्रतिनिधी

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर गेवराई परिसरात विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या एका मोठ्या ट्रकवर बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या () पथकाने रविवारी (दि. २३) पहाटे धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे १५ ब्रास वाळूसह अशोक लेलँड कंपनीचा ट्रक असा एकूण ३५ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन जणांवर गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गेवराई परिसरात अवैध धंद्यांवर कारवाईसाठी गस्त घालत असताना, धुळे-सोलापूर महामार्गावरील हॉटेल डिसेंटसमोर विनापरवाना वाळू भरलेला



ट्रक जात असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष पहाटे सुमारे २:३० वाजता सापळा रचून छापा टाकला. यावेळी अशोक लेलँड कंपनीचा केशरी रंगाचा ट्रक (क्रमांक -२६- -०११५) ताब्यात घेण्यात आला.

वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे १५ ब्रास वाळू आढळून आली. चालकाकडे वाळू वाहतुकीचा कोणताही अधिकृत परवाना किंवा पास आढळून आला नाही. याप्रकरणी जितेंद्र राजेंद्र नेमाणे (वय २३) आणि गणेश राजेंद्र नेमाणे (वय २४, दोघे रा. नारायणगाव, ता. अंबड, जि. जालना) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी वाळूसह ट्रक

## निगमानंद संस्थानवरती आजपासून भरणार एकादशीची वारी

शिरूर । प्रतिनिधी

निगमानंद संस्थान नांदेवली - माळेवाडी येथे आजपासून शुद्ध एकादशीनिमित्त वारी भरणार असून या वारीच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाबरोबरच पंचक्रोशीतील भाविक -भक्तांना अध्यात्माचे ज्ञान मिळावे यासाठी संस्थानवतीने ७ ते ९ वेळेमध्ये कीर्तनाचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती संस्थान मठाधिपती उद्धव महाराज शास्त्री यांनी दिली आहे.

शिरूर कासार तालुक्यातील नांदेवाली -माळेवाडी येथे हभप. उद्धव महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून व पंचक्रोशीतील भक्तांच्या सहकार्यातून श्री निगमानंद संस्थानची उभारणी करण्यात आली आहे. या संस्थान वरती वै. स्वामी





निगमानंद महाराज व वै. वेदांतचार्य विश्वंभर महाराज शास्त्री यांच्या प्रतिमेची स्थापना करून संस्थान वरती विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन राबवले जाऊ लागले आहेत. या संस्थानच्या माध्यमातून पंचक्रोशीतील भाविक अध्यात्मिक ज्ञानमृताचे प्रबोधन मिळावे यासाठी संस्थानच्या माध्यमातून विविध याठिकाणी कथा, प्रवचन,कीर्तन अशा समाजप्रभोधनच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊ लागले आहेत. याचाच एक भाग म्हणून श्रावण शुद्ध एकादशी पासून संस्थानवरती वारीचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार दि. २४ ऑगस्ट रोजी येणाऱ्या या एकादशीला या ठिकाणी दिवसभर भजन, प्रवचन,हरिपाठ असे विविध कार्यक्रम आयोजित केले असून सायंकाळी ७ ते ९ या वेळेमध्ये संस्थानचे मठाधिपती हभप. उद्धव महाराज शास्त्री यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर मौजे नांदेवली, माळेवाडी या ग्रामस्थांच्यावतीने आलेल्या भाविक-भक्तांसाठी फराळीची पंगती देण्यात येणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या कार्यक्रम उपस्थित लाभ घ्यावा असे अवाहन संस्थानचे मठाधिपती उद्धव महाराज शास्त्री यांनी केले आहे.

## गावचा कट्टा अन् जुन्या पिढीच्या आठवणी गावपण जपणारी पिढी काळाच्या पडद्याआड

### साधेपणात जीवन जगलेल्या या पिढीकडे अनुभव, संयम,आदर आणि संस्कारांची मोठी शिदोरी

ज्योतीराम पांढरपोटे/ माजलगाव

गावातील कट्ट्यावर पांढरी टोपी,सदरा आणि धोतर परिधान करून बसलेली ज्येष्ठ मंडळी हे केवळ एक दृश्य नसून गावच्या संस्कृतीची आणि गावपणाची ओळख आहे.ही पिढी जोपर्यंत गावात आहे, तोपर्यंत गावातील पारंपरिक संस्कार, माणुसकी आणि आपुलकीचे वातावरण टिकून राहणार आहे.आजच्या सोशल मीडियाच्या आणि झगमगाटाच्या युगात जगताना जुन्या पिढीने मात्र अत्यंत साधेपणाने जीवन जगले. जीवनातील अनेक संघर्षांना सामोरे जात त्यांनी कोणत्याही आधुनिक साधनांशिवाय आपले आयुष्य घडवले. कमी साधनांमध्ये समाधान मानत त्यांनी नाती जपली



आणि माणुसकीला महत्त्व दिले.

जुनी माणसं कदाचित फारशी शिकलेली नसतील; मात्र त्यांच्याकडे संयम, आदर,माणुसकी आणि आयुष्यभराच्या अनुभवाची मोठी ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26